रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १००
www.ramprahar.com

शनिवार, २६ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

महाडमध्ये धारदार हत्याराने शेतकऱ्याची निर्घृण हत्या/२
शुभ वर्तमान! माथेरानमधील जंगल पुन्हा बहरले/५
पुणे कसोटीत भारताची फलंदाजी ढेपाळली/८

## 'मविआ'तील जागावाटपावरून राहुल गांधी नाराज



**नवी दिल्ली :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. विशेषकरून काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये जागांवरून वाद आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस निवडणूक समितीची बैठक शुक्रवारी (दि. २५) दिल्लीत झाली. या वेळी जागावाटपावरून काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी नाराजी व्यक्त केल्याची सूत्रांची माहिती आहे. यावर बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले की, आमचे नेते राहुल गांधींचे बरोबर आहे की, महाराष्ट्रात काँग्रेसला जास्त जागा मिळाल्या पाहिजेत. विशेषकरून विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई या भागात काँग्रेसला मेरिटच्या आधारावर जास्त जागा मिळायला पाहिजेत, पण आघाडी आमच्या तीन पक्षांची आणि आमचे अजून मित्रपक्ष, या सगळ्यात घोळ झाला आहे.

# राज्यात पुन्हा सरकार स्थापन करू

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा निर्धार; उमेदवारी अर्ज दाखल





**नागपूर : प्रतिनिधी**

जनतेचा आशीर्वाद मला आणि महायुती सरकारलाही मिळेल. महायुती सरकारने केलेल्या कामांमुळे आम्ही राज्यात पुन्हा सरकार स्थापन करू. महाराष्ट्राला दिलेली गती कायम राखणे हेच आमचे ध्येय आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. २५) येथे केले.

उमेदवारी अर्ज दाखल करताना जोरदार शक्तिप्रदर्शन पहायला मिळाले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, मोहन मते, परिणय फुके, प्रवीण दटके आदी नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमचे मार्गदर्शक नितीन गडकरींच्या नेतृत्वामध्ये नागपूरमध्ये केलेला बदल लोकं डोळ्यांनी पाहत आहेत. विरोधकांना आमच्या लाडक्या बहिणीच पुरून उरतील. शेतकऱ्यांना वीज, मुलींना मोफत शिक्षण, आदिवासी घटकांचा विकास आम्ही करून दाखवला. ओबीसी समाजासाठी आम्ही ४८ अध्यादेश काढले. काँग्रसने त्यांच्या कार्यकाळात ओबीसींच्या विकासासाठी एकही अध्यादेश काढला नाही, पण आम्ही ओबीसींसाठी ५४ वसतिगृह बांधले. काँग्रेसने एकही वसतिगृह बांधले नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

पक्षाच्या नेत्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे सहाव्यांदा तिकिट दिल्याबद्दल आभार मानले.

## पीपल्स रिपब्लिकन पार्टीचा आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे पत्र सुपूर्द



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पीपल्स रिपब्लिकन पार्टीने पनवेल विधानसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे आमदार प्रशांत ठाकूर यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याचे पत्र पीआरपीचे रायगड जिल्हाध्यक्ष सीताराम कांबळे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे शुक्रवारी (दि. २५) सुपूर्द केले.

विधनासभा निवडणुकीसाठी महायुतीतर्फे पनवेल मतदारसंघात भाजप आमदार प्रशांत ठाकूर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पीपल्स रिपब्लिकन पार्टी महायुतीतील घटक पक्ष असून पनवेल मतदारसंघातील पीआरपीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते आमदार प्रशांत ठाकूर यांचे काम करणार असल्याचे या पाठिंबापत्रात नमूद करण्यात आले आहे. पत्र देताना पीआरपीचे तालुका अध्यक्ष विद्यानंद जाधव हेही उपस्थित होते.

## श्रीवर्धनमधून मंत्री आदिती तटकरे यांचा अर्ज दाखल



**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**

राज्याच्या महिला व बाल विकासमंत्री आणि श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार आदिती तटकरे यांनी शुक्रवारी (दि. २५) आपला अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यासाठी हजारो कार्यकर्ते श्रीवर्धन शहरात दाखल झाले होते.

चार महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये खासदार सुनील तटकरे यांनी रायगड मतदारसंघातून ९३ हजार मतांनी विजय मिळवला होता. त्या वेळी श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातून खासदार तटकरे यांना चांगले मताधिक्य मिळाले होते.

आदिती यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना महायुतीचा धर्म पाळत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व शिवसेनेचे महाडचे आमदार भरत गोगावले, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, माजी आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, विजय मोरे, विनोद पाशिलकर, सरचिटणीस सुरेश मगर तसेच नीलम अंतुले आदी उपस्थित होते.

## रायगड जिल्ह्यात चौथ्या दिवशी तीन उमेदवारी अर्ज

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी चौथ्या दिवशी रायगड जिल्ह्यातील तीन उमेदवारांनी पाच नामनिर्देशनपत्र दाखल झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आदिती सुनील तटकरे यांनी एकूण तीन अर्ज दाखल केले. कर्जत मतदारसंघात अपक्ष उमेदवार सुधाकर परशुराम घारे आणि उरणमध्ये अपक्ष श्रीकन्या तेजस डाकी यांनी प्रत्येकी एक अर्ज दाखल केला आहे.

## पाच जागा द्या; अन्यथा २५ जागांवर लढणार!

### सपाचा महाविकास आघाडीला इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील तिन्ही प्रमुख पक्षांनी आपापल्या पहिल्या यादीमधून काही जागांवरील उमेदवारांची घोषणा केली आहे, मात्र मित्रपक्षांना किती जागा मिळणार हे स्पष्ट होऊ शकलेले नाही. त्यामुळे महाविकास आघाडीतील छोट्या पक्षांच्या मनामध्ये चलबिचल निर्माण झालेली आहे. या आघाडीतील छोट्या घटक पक्षांपैकी प्रमुख पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाने पाच जागा; द्या अन्यथा आम्ही २५ जागांवर निवडणूक लढवणार असा थेट इशाराच दिला आहे.

उद्यापर्यंत महाविकास आघाडीचे जागावाटप जाहीर झाले नाही, तर स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतला जाईल, असे समाजवादी पक्षाचे महाराष्ट्रातील नेते अबू आझमी यांनी शुक्रवारी (दि. २५) प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हटले.

याआधी माझी दोनवेळा काँग्रेसकडून फसवणूक झालेली आहे, कारण हे लोक शेवटच्या एक दोन दिवसांपर्यंत वाट पाहा, वाटा पाहा असं सांगतात आणि शेवटच्या क्षणी फसवणूक करतात, असा आरोप अबू आझमी यांनी केला. ते पुढे म्हणाले की, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी मला एक दिवस थांबण्यास सांगितले आहे. जर यांनी तोपर्यंत आम्हाला पाच जागा देण्याची घोषणा केली तर मी महाविकास आघाडीमध्ये राहीन. नाहीतर मी आमचे २५–३० उमेदवार मैदानात उतरवेन.

दरम्यान, महाविकास आघाडीत मित्रपक्षांना अपेक्षित जाता मिळत नसल्याने त्यांच्यात चलबिचल दिसून येत आहे. आता महाविकास आघाडी यावर कसा मार्ग काढणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## निवडक

### आदित्य ठाकरेंना वरळीत मिलिंद देवरा यांचे आव्हान

**मुंबई :** वरळी विधानसभा मतदारसंघातून शिवेसना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे दुसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. या वेळी त्यांना मतदारसंघात कडवे आव्हान मिळणार आहे. मनसेकडून संदीप देशपांडे आणि आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मिलिंद देवरा यांचे तगडे आव्हान आदित्य ठाकरेंच्या विरोधात उभे ठाकले आहे. देवरा यांनी एक्सवर पोस्ट करून उमेदवारीबाबत माहिती दिली. वरळीकरांना न्याय देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मला निवडणुकीला उभे राहण्याची सूचना दिली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

### मनसेची पाच उमेदवारांची चौथी यादी जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उमेदवारांची चौथी यादी शुक्रवारी (दि. २५) जाहीर केली. या यादीत पुणे, बीड, कोल्हापूर, मुंबईतील पाच उमेदवारांचा समावेश आहे. गणेश भोकरे (कसबा पेठ), गणेश बरबडे (चिखली), अभिजित राऊत (कोल्हापूर उत्तर), रमेश गालफाडे (केज), संदीप उर्फ बाळकृष्ण हटगी (कलीना) अशी त्यांची नावे आहेत. आतापर्यंत एकूण मनसेने ६३ नावे जाहीर केली आहेत.

## खालापूर टोलनाक्यावर वाहनात आढळली कोट्यवधींची चांदी



**संबंधित मालाची तपासणी सुरू आहे. चांदी आणि मिठाई असे १७३ बॉक्स आहेत. कायदेशीर असेल तर माल परत करण्यात येईल.**
**–ओंकार खामकर, प्रभारी निवडणूक अधिकारी**

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेदरम्यान सुरू असलेल्या नाकाबंदीत खालापूर टोलनाक्यावर कोट्यवधींची चांदी शुक्रवारी (दि. २५) आढळली.

खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम आणि पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना पीकअप टेम्पोमधून चांदीची मोठ्या प्रमाणात वाहतूक मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरून होत असल्याची खबर मिळाली होती. पोलीस पथकाने शुक्रवारी पहाटे खालापूर टोलनाका येथे सापळा रचला. मिळालेल्या माहितीच्या वर्णनाचा पीकअप टेम्पो (एमएच–०१ ईएम ८७७५) पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी सकाळी पावणेसातच्या सुमारास खालापूर टोलनाक्यावर आला. पोलिसांनी हे वाहन ताब्यात घेत तपासणी केली असता आत चांदी असल्याचे दिसून आले. हे वाहन खालापूर पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून पंचासमक्ष संबंधित मालाची तपासणी उशिरापर्यंत सुरू होती. जवळपास पाच ते सात कोटी रुपयांची चांदी असल्याची प्राथमिक माहिती आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

### पळस्पे चेक पोस्टवर सहा लाखांची रोकड जप्त

**पनवेल :** टाटा पंच गाडीत सहा लाखांची रक्कम पनवेलजवळील पळस्पे फाटा चेक पोस्ट येथे शुक्रवारी (दि. २५) आढळली. ही रक्कम निवडणूक विभाग अंतर्गत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिर सर्वेक्षण पथकामार्फत जप्त करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## कर्जतमध्ये बनावट सिगारेट कारखान्यावर छापा

### पाच कोटींचा मुद्देमाल जप्त, १५ जणांना अटक

**अलिबाग, कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वषण शाखेने (एलसीबी) कर्जत तालुक्यातील सांगवी येथील एका फार्महाऊसमध्ये गोल्ड फ्लॅग कंपनीच्या नावाने बनावट सिगारेट बनविणाऱ्या कारखान्यावर छापा टाकून सुमारे पाच कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी १५ जणांना अटक करण्यात आली आहे.



**सांगवी येथील कंपनीत सिगारेट निर्मिती करण्याकरिता लागणाऱ्या सेमी ॲटोमॅटिक तीन मशीन, प्रक्रिया केलेली सुगंधित तंबाखू, कागद, पॅकेट, पॅकिंगसाठी बॉक्स व इतर साहित्य आढळून आले. ते सर्व जप्त करण्यात आले असून १५ जणांना अटक करण्यात आली आहे. कंपनीच्या मालकाचा शोध सुरू आहे. ज्या फार्महाऊसमध्ये ही कंपनी सुरू होती तो फार्महाऊस सील केला जाणार आहे.**
**–सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक**

या कंपनीचा मालक हैदराबाद येथील असून त्याचा शोध पोलीस घेत आहेत. ज्या फार्महाऊसमध्ये ही कंपनी सुरू होती तो सिल करण्यात येणार आहे, अशी माहिती रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शुक्रवारी (दि. २५) पत्रकार परिषदेत दिली. अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, एसीबीची पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे या वेळी उपस्थित होते.

पोलीस पथकाने सांगवी गावात जाऊन अब्बास फार्महाऊसवर छाप टाकला असता तेथील गाळ्यामध्ये गोल्ड फ्लॅग कंपनीच्या नावाने बेकायदेशीरपणे सिगारेट निर्मिती करण्यात येत असल्याचे आढळून आले. या बेकायदेशीर व्यवसायावर कारवाई करून दोन कोटी ३१ लाख ६० हजार रुपये किमतीच्या सिगारेट, १५ लाख ८६ हजार ९०० रुपये किमतीचे सिगारेट करण्याकरिता लागणारे साहित्य, दोन कोटी ४७ लाख रुपये किमतीची सिगारेट तयार करण्याकरिता लागणारी यंत्रे असा एकूण चार कोटी ९४ लाख ४६ हजार ९६० रुपये किमतीचा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून १५ जणांना अटक करण्यात आली आहे.

आरोपींमध्ये कुमार विश्वकर्मा (मध्य प्रदेश), कम्मारी राजेश्वर, नारायण सर्यनारायण, महमद बशीर, हरिप्रसाद चाकली, लेक राम सोनी (छत्तीसगड), सिद्धार्थ कोल्हटकर, मनोहर खांडेकर, युसुब शेख, कैलास कोल्हटकर, दुर्गाप्रसाद अनुसुरी, रवी पिथानी, मनीकंटा लावीटी (आंध्र प्रदेश), सोहेल सिंग, हरिश मोर्या (उत्तर प्रदेश) यांचा समावेश आहे. कारखान्याचा व जागेचा मालक, सिगारेट बनविण्याकरिता लागणारे मटेरियल कुठून आले, तयार केलेल्या सिगारेट कुठे वितरीत करण्यात आल्या याबाबत सखोल तपास करण्यात येत आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे पनवेलचा वेगवान विकास

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे प्रतिपादन; विरोधकांवर हल्लाबोल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचा वेगवान विकास आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे होत आहे. जे पूर्वीचे लोकप्रतिनिधी होते त्यांनी लोकांमध्ये भांडण लावण्याचे काम केले, भ्रष्टाचार करून गोरगरीबांचे पैसे हडप केले. अशांना जेलमध्ये टाकण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले असल्याचे सांगत पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नागझरीमध्ये आमदार चषक क्रिकेट स्पर्धेवेळी विरोधकांवर हल्लाबोल केला.

श्री कृष्ण स्पोर्ट्सच्या वतीने महेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार चषक २०२४ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २२ ते २७ ऑक्टोबरदरम्यान नागझरी येथील मैदानावर रंगणार आहे. या स्पर्धेला पनवेल महापालिकचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २५) भेट देत शुभेच्छा दिल्या. त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले.

या वेळी भाजप नेते तथा आयोजक महेश पाटील, भारत म्हात्रे, निवृत्ती म्हात्रे, कमलाकर म्हात्रे, भारत म्हात्रे, सुनील म्हात्रे, जयवंत म्हात्रे, रोहिदास म्हात्रे, रूपेश म्हात्रे, शांताराम म्हात्रे, नरेश म्हात्रे, ऐकनाथ म्हात्रे, कुणाल म्हात्रे, साहिल म्हात्रे, अमोल म्हात्रे, मनोज म्हात्रे, अक्षय म्हात्रे, यश म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

पनवेल मतदारसंघाचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे झपाट्याने विकास होत आहे. अशाच विकासकामांची गंगा मतदारसंघात वाहत राहावी यासाठी आपण सर्वांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे आवाहन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या वेळी केले.

## वाशी खाडीपुलावर अपघात; तिघे ठार

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी खाडीपुलावर शुक्रवारी (दि. २५) पहाटे झालेल्या एर्टिगा कार आणि डम्परच्या भीषण अपघात तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन पुरुष व एका महिलेचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार एर्टिगा कार पुण्याहून मुंबईकडे चालली होती. पहाटे सव्वाचारच्या सुमारास कारचालकाचे वेगावरील नियंत्रण सुटले आणि गाडीने समोरील चालत्या डम्परला जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की, कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातग्रस्त गाडी बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे.

## पनवेलमध्ये आज विजय निर्धार युवा मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल विधानसभेच्या वतीने शनिवारी (दि. २६) सायंकाळी ६ वाजता शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या मैदानात विजय निर्धार युवा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळाव्यास कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख व उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी महापौर कविता चौतमोल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

भारत देश युवकांचा म्हणून जगात ओळखला जातो. त्याच अनुषंगाने युवकांच्या हक्कांसाठी तसेच त्यांच्या सर्व स्तरावरील समस्या सोडविण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा सातत्याने काम करीत असतो. या युवा मोर्चाच्या वतीने निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास युवकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस अभिषेक भोपी, दिनेश खानावकर, पनवेल तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, कामोठे मंडल अध्यक्ष तेजस जाधव, कळंबोली मंडल अध्यक्ष गौरव नाईक, खारघर मंडल अध्यक्ष नितेश पाटील यांनी केले आहे.

# नवे चेहरे, आयारामांवर उद्धव ठाकरेंची भिस्त

## इच्छुकांमध्ये नाराजीचा सूर; बंडाचे प्रमाण वाढले

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सत्तासंघर्षानंतर प्रथमच विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आपली पहिली उमेदवार यादी जाहीर केली. ६५ उमेदवारांच्या या यादीत आजी-माजी आमदार, माजी खासदार, निष्ठावंत पदाधिकारी तसेच निवडणुकीच्या तोंडावर पक्षात प्रवेश करणाऱ्यांना संधी दिली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी इच्छुक पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजीनाट्य सुरू झाले आहे. याची प्रचिती रायगडमधील कर्जत विधानसभा मतदारसंघातही आली.

शिवसेनेतील बंडाळीनंतर विधानसभेच्या रणांगणात उतरलेल्या उद्धव ठाकरे यांनी जुने-नवे चेहरे आणि आयारामांचा मिलाफ साधला असला, तरी आता त्यांच्यावरच जिंकण्याची भिस्त आहे. अस्तित्वाची असलेल्या



या लढाईत मतदारराजा कुणाच्या बाजूने उभा राहतो, हे ठरवणारी ही निवडणूक आहे.

उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलेल्या यादीत युवा सेनेचे सचिव वरुण सरदेसाई यांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. शिवसेना ठाकरे गट पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या वांद्रे पूर्व विधानसभा मतदारसंघातून सरदेसाई यांना उमेदवारी दिली आहे. ठाकरे गटाच्या यादीत उद्धव ठाकरे यांची साथ देणाऱ्या १५पैकी १४ आमदारांवर पुन्हा विश्वास व्यक्त केला आहे. यामध्ये मुंबईतील सहा आमदारांचा समावेश आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पक्षप्रवेश केलेल्या इच्छुकांवरही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विश्वास दाखवत त्यांना उमेदवारी दिली आहे.

यात स्नेहल जगताप (महाड), दीपेश म्हात्रे (डोंबिवली), सुरेश बनकर (सिल्लोड), दीपक साळुंखे (सांगोला), राजन तेली (सावंतवाडी), उन्मेश पाटील (चाळीसगाव), सुरेंद्रनाथ (बाळ) माने (रत्नागिरी), के. पी. पाटील (राधानगरी) आदींचा समावेश आहे. इतर पक्षांतून आलेल्या आयारामांना संधी मिळाल्यामुळे नाराज झालेल्या निष्ठावंतांकडून काही मतदारसंघांत राजीनामानाट्य सुरू झाले आहे.

रायगड जिल्ह्यातील कर्जत विधानसभा मतदारसंघात ठाकरे गटाकडून नितीन सावंत यांना उमेदवारी देण्यात आली आहे, मात्र यामुळे माथेरान नगर परिषद हद्दीतील १० माजी नगरसेवकांसह सर्वच पदाधिकाऱ्यांनी माजी नगराध्यक्ष व गटनेते प्रसाद सावंत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. यामुळे शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार नितीन सावंत यांना धक्का बसल्याचे बोलले जात आहे. त्याचप्रमाणे या मतदारसंघात इच्छुक असलेल्या डॉ. सुनील पाटील यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचा सूर उमटला असून या नाराजीचा फटका येत्या निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला पाडण्याची शक्यता बोलली जात आहे. त्याचा फायदा महायुतीच्या उमेदवाराला होऊ शकतो.


# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खासगी बस जळून खाक

## चालकाच्या प्रसंगावधानाने ४५ प्रवासी बचावले

**खोपोली : प्रतिनिधी**

काळ आला होता, परंतु वेळ आली नव्हती याचा अनुभव ४५ प्रवाशांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर गुरुवारी मध्यरात्री घेतला. शॉर्टसर्किट होऊन जळून खाक झालेल्या बसमधील प्रवासी चालकाच्या प्रसंगावधानामुळे वाचले आहेत.

मलकापूर ते विरार खासगी प्रवासी बस गुरुवारी मध्यरात्री १.३० वा.च्या सुमारास मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून निघाली होती. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत पानशीळ गावानजीक बसचालक संभाजी नामदेव नांगरे (रा.शिराळा,सांगली) याला बसमधून धूर येत असल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने बस शोल्डर



लेनवर थांबवून सर्व प्रवाशांना सामानासह खाली उतरवले. काही मिनिटांतच बसने पेट घेतला. बसचालक संभाजी नांगरे आणि सोबत असलेल्या क्लिनरने आग प्रतिबंधक सिलेंडरमधून फोमचा मारा करीत आग विझवण्याचा प्रयत्न केला, तसेच बसमध्ये असलेले पाण्याचे ड्रममधून पाण्याचा मारा केला, परंतु आगीची तीव्रता वाढत जाऊन संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलीस रसायनी पोलीस ठाण्याचे कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. बसमधील प्रवाशांना अन्य बसचा पर्याय उपलब्ध करून पुढे रवाना करण्यात आले. रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कोळेकर करीत आहेत.

# निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी उरणमध्ये विशेष बैठक

**उरण : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडावी, यासाठी निवडणूक प्रशासन सज्ज झाले आहे. यासाठी रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, पेण आणि कर्जत विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय खर्च निरीक्षक रमेश कुमार यांनी बुधवारी उरण विधानसभा मतदारसंघातील कार्यालयास सायंकाळी भेट दिली.

निवडणूक कामाच्या तयारीची बैठक घेऊन, निवडणुकीच्या नियोजनाचा आढावा घेतला. यात संबंधित निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडण्याबाबतच्या विशेष सूचना दिल्या.

दरम्यान निवडणूक पारदर्शक पार पडण्यासाठी वाहनांमधून बेकायदा पैसे, मद्य, किमती वस्तू नेणाऱ्यांना चाप लावण्यासाठी उरण विधानसभा कार्यालयाने भरारी पथके, स्थिर संरक्षण इत्यादी पथकांची नेमणूक केली आहे. केंद्रीय आयोगाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी जेएनपीटी बंदरातून होणाऱ्या वाहतुकीवर विशेष लक्ष देण्याबाबत विधानसभा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना बैठकीत आदेश दिले आहेत.

या बैठकीस केंद्रीय खर्च निरीक्षक रमेश कुमार, उरण विधानसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. उद्धव कदम, सहा. खर्च निरीक्षक सुभाष पवार, सहा. संचालक स्थानिक लेखा निधी रायगड प्रविण वडगाये, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहुल व विधानसभा संपर्क अधिकारी उपस्थित होते.

विधानसभा निवडणूक कामावर विशेषतः एफएसटी, एसएसटी पथकाने जेएनपीटी बंदराच्या वाहतुकीवर विशेष लक्ष देण्याबाबत केंद्रीय निरीक्षकांनी सुचविले आहे.

# महाडमध्ये धारदार हत्याराने शेतकऱ्याची निर्घृण हत्या

**महाड : प्रतिनिधी**

धारदार हत्याराने वार करून एका शेतकऱ्याची निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना महाड तालुक्यातील चांढवे बुद्रुक येथे घडली आहे. याबाबत महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात मारेकऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई-गोवा महामार्गालगत महाड तालुक्यातील चांढवे बुद्रुक येथील जनावरांच्या गोठ्याकडे जाणाऱ्या पायवाटेवर त्याच गावातील अर्जुन भाऊ शेडगे या शेतकऱ्याचा मृतदेह गुरुवारी (दि.२४) आढळून आला. अर्जुन शेडगे हे आपल्या गुरांच्या गोठ्याकडे गेले होते, अशी प्राथमिक माहिती स्थानिकांनी दिली. मृत व्यक्तीच्या डोक्यावर, कानावर कोणत्यातरी धारदार हत्याराने गंभीर वार केले असल्याचे दिसून येत आहे. ही हत्या दुपारी ३.३० ते संध्याकाळी ७ वा.च्या दरम्यान घडली असून हत्या कोणी व का केली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

# महायुती विरोधकांवर भारी पडेल -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत अप्रचार करूनही मशालवर धनुष्यबाण भारी पडला होता. या निवडणुकीत कोकणातून त्यांचा एकही खासदार निवडुण आला नसून विधानसभेतही त्यांची पुनरावृत्ती होईल, तसेच विधानसभा निवडणुकीत कामाच्या आणि विकासाच्या जोरावर महायुतीचा स्ट्राईक रेट हा सर्वात भारी असेल आणि महायुती विरोधकांना चारिमुंड्या चीत करेल, असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि.२५) ठाण्यात व्यक्त केले.



ओवळा-माजीवडा मतदार संघातील शिवसेनेचे उमेदवार प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना महाविकास आघाडीसह ठाकरे गटावर टिका केली. महाविकास आघाडीने केलेले काम आणि महायुतीने सव्वादोन वर्षात केलेले काम याची तुलना होईल आणि दूध का दूध, पाणी का पाणी होईल. कल्याणकारी योजना, विकास प्रकल्प राबविणाऱ्या महायुतीच्या बाजूने जनता उभी राहील आणि राज्यात महायुतीचे सरकार बहुमताने सत्तेवर येऊन जनतेची सेवा करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.


लोकसभा निवडणुकीत मशाल विरूद्ध धनुष्यबाण जिंकलेला आहे. या निवडणुकीत आम्ही मशाल विरोधात १३ जागांवर समोरासमोर लढलो आणि त्यातील सात जागा आम्ही जिंकल्या. अपप्रचार आणि फसवणूक करूनही उबाठापेक्षा जास्त जागा जिंकल्यामुळे मशालवर धनुष्यबाण भारी पडला आहे.

# मुंबई-बडोदा महामार्गाच्या माथेरानजवळील दुसऱ्या बोगद्याचे काम पूर्णत्वाकडे

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-बडोदा महामार्गाच्या माथेरान डोंगररांगांखालील शिरवली गावालगतचा पहिल्या बोगद्याचे खोदकाम ऑगस्ट महिन्यात आरपार झाल्यानंतर दुसऱ्या बोगद्याचे खोदकाम आरपार झाल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकांनी दिली.

सध्या या मार्गावर युद्धपातळीवर रस्त्याचे काम सुरू असून जुलै २०२५पर्यंत हे काम पूर्ण करण्याच्या जोरदार हालचाली प्राधिकरणाकडून सुरू आहेत. या दुहेरी बोगद्यामुळे आणि प्रशस्त महामार्गामुळे काही मिनिटांत



बदलापूर येथील नागरिकांना पनवेल, उरण जेएनपीटी बंदरामध्ये आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पापर्यंत पोहचता येणार आहे.

सिडकोच्या नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्राला (नैना) थेट दिल्लीशी जोडणारा मुंबई-बडोदा या महामार्गामुळे पनवेलचे अर्थकारण बदलणार आहे. पुढील नऊ महिन्यांत रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कंबर कसली आहे. सुमारे सव्वाचार किमी अंतरावर दुहेरी बोगद्याचे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे, तसेच शेवटच्या पॅकेज क्र.१७चे सरासरी ४५ टक्के काम पुर्ण झाले आहे. दुहेरी बोगदा आरपार करण्याचे काम ठरविलेल्या मुदतीपेक्षा अगोदर पूर्ण झाल्याने प्राधिकरणाच्या कामाविषयी समाधान व्यक्त केले जात आहे. पॅकेज १७ हा ९.६ किलोमीटर अंतराचा असून बदलापूरच्या भोज गावापासून ते पनवेलमधील मोरबे गावापर्यंत हा रस्ता बांधला जाणार आहे. यामध्ये ४.३९ किमीचे दुहेरी भोगदे माथेरान डोंगररांगांखालून खोदले आहेत. १३ मीटर उंच आणि २३ मीटर रुंदीच्या या दुहेरी बोगद्यात ८ वेगवेगळ्या मार्गिका असतील.

# खालापूर बसथांबा निवारा शेडची दुरवस्था


## ■ नगरपंचायतीकडे दुरूस्तीसाठी निधी नसल्याचे कारण

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्याच्या ठिकाणी असलेली बसथांबा निवाराशेड भकास अवस्थेत असून प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर खालापूर नगरपंचायत हद्दीत खालापूर फाटा येथे बस थांबा निवारा शेड आहे. खोपोलीकडे जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी ग्रामपंचायत काळात ही बसथांबा निवाराशेड बांधण्यात आली होती. बसथांबा निवाराशेड बांधून एक तप उलटले असून तेवढ्या कालावधीत एकदाही बस थांब्याची दुरूस्ती झालेली नाही. बसथांबा शेडचा पत्रा वर्षभरापासून गायब आहे.

सध्या निवाराशेडचे बांधकामदेखील जीर्ण अवस्थेत असून भिंती तकलादू झाल्या आहेत. यामुळे धोकादायक



शेडमध्ये बसण्यापेक्षा महामार्गावर उभे राहणे प्रवासी पसंत करत आहेत.

खालापूर शहरात नगरपंचायत हद्दीत लाखोंची विकासकामे सुरू असताना बसथांबा निवाराशेडवर तुटपुंजी रक्कम खर्च करण्यासाठी नगरपंचायतीकडे निधी नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

**ऊन, पावसात रस्त्यालगत उभे राहण्यापेक्षा बसथांबा निवाराशेड सुरक्षित वाटते, परंतु खालापूर फाटा येथे असलेल्या बसथांबा निवाराशेडमध्ये वाढलेले गवत, आतमधील निघालेल्या लाद्या, वरती नसलेला पत्रा यामुळे प्रवाशांना त्या ठिकाणी बसायची इच्छा होत नाही.**
**-किर्ती पाटील, प्रवासी**

**सामाजिक भावनेतून बसथांबा निवाराशेडची दुरूस्तीचा प्रस्ताव नगरपंचायतीकडे आला होता. त्यावर विचार सुरू आहे. सध्या नगरपंचायतीकडे निधी नसल्याने दुरूस्ती करता येत नाही.**
**-दिनेश फराट, बांधकाम सभापती**

# पडसरे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकडून दिवाळीसाठी पणत्या, फराळ करून विक्री

**पाली : प्रतिनिधी**

कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ संचालित अनुदानित आश्रमशाळा पडसरे यांच्या वतीने अनोखा उपक्रम राबविण्यात आला आहे. व्यवसाय पूर्व अभ्यासक्रमांतर्गत इयत्ता ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांनी सुशोभित पणत्या, आकाशकंदील, चकली, गांडूळ खत, जीवामृत, दशपर्णी अर्क तयार केले. या वस्तू पाली नगरपंचायत कार्यालयासमोर दिवाळी स्टॉलच्या माध्यमातून विक्रीसाठी मांडण्यात आल्या.

मातीच्या पणत्या बाजारातून आणून आदिवासी विद्यार्थ्यांनी त्यांना रंगकाम करून गृह आणि आरोग्य निदेशिका निलम गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सुंदर आणि आकर्षक बनवल्या. एक पणती जोडी २५ रुपयांना आहे. या मुलांनी तयार केलेल्या पणत्या खरेदीसाठी ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, असे नीलम गुरव यांनी सांगितले. शेती आणि पशुपालन



या विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कीटकनाशकांची देखील विक्री मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. या वेळी शंतनू लिमये, आयबीटी निदेशक नीलम गुरव, निलेश फाटे, विद्यार्थी उपस्थित होते.

या स्टॉलला संस्थेचे संचालक रवींद्र लिमये, संचालिका शिल्पा लिमये, संजीव गद्रे, शंतनु लिमये, तसेच शहरातून अनेक नागरिकांनी भेट दिली. विद्यार्थ्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे कौतुक करून या वस्तू खरेदी केल्या. हा उपक्रम राबविण्यासाठी माध्यमिक मुख्याध्यापक संदीप शिंदे, प्राथमिक मुख्याध्यापिका मीनाक्षी ढोपे, निलेश फाटे, निलम गुरव यांनी विद्यार्थ्यांना सहकार्य केले.

**आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या या वस्तू उत्तम व दर्जेदार आहेत, तसेच रंगकाम करून तयार केलेल्या पणत्या खूप आकर्षक आणि देखण्या आहेत. त्यांच्या या कलेचे कौतुक करू तेवढे कमीच आहे.**
**-सुलतान बेनसेकर, नगरसेवक, पाली**

# जेएनपीएमध्ये रिकाम्या कंटेनर यार्डमधील कामकाजासाठी मार्गदर्शक तत्वे लागू

**उरण : वार्ताहर**

भारताचे सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने (जेएनपीए) वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांच्या निर्देशानुसार रिकाम्या कंटेनर यार्डमधील कामकाज सुव्यवस्थित करण्यासाठी मानक कार्यप्रणाली लागू करून रिकाम्या कंटेनर यार्डशी संबंधित चिंता दूर करण्यासाठी सक्रिय उपाययोजना केल्या आहेत. हे निर्देश देते की, शिपिंग लाइन्सने पैसे गोळा करावेत आणि रिकाम्या कंटेनर यार्डला पेमेंट करावे जेणेकरून रिकामे कंटेनर रिकाम्या कंटेनर यार्डमध्ये थांबू नयेत.

हाताळणी शुल्काची ऑनलाईन देयके सर्व डेपो कार्यकारी सदस्यांद्वारे स्वीकारली जातील. वाहतूकदारांच्या चिंतेचे




निराकरण करण्यासाठी आणि व्यापार अधिक सुलभ करण्यासाठी आणि देयकांमधील गुंतागुंत टाळण्यासाठी, ईसीवाय ऑपरेटर्सना सर्व देयके शिपिंग लाईन्सद्वारेच दिली जातील आणि वाहतूकदार रिकाम्या कंटेनर यार्ड डेपोत पोहोचण्यापूर्वी पूर्णपणे पेड डिलिव्हरी ऑर्डर तयार असावी. डेपो कंटेनरचे सर्वेक्षण करेल आणि शिपिंग लाइन्स मानक कार्यप्रणाली (एसओपी)प्रमाणे आणि मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे रिकामे कंटेनर उतरवेल. मुदत संपलेल्या रिकाम्या स्वीकृती पत्रासह यार्डात येणाऱ्या कोणत्याही वाहतूकदाराला शिपिंग लाइनकडून वैध कागदपत्रे मिळेपर्यंत ग्राह्य धरले जाणार नाही. हे शिपिंग लाइन मानक कार्यप्रणालीनुसार (एसओपीनुसार) आहे.

वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे संभार तंत्र (लॉजिस्टिक्स) आणि व्यापार विभागाचे संयुक्त सचिव, आईआरटीएस डॉ. सुरेंद्र कुमार अहिरवार यांनी २६ सप्टेंबर ला जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेश शरद वाघ यांच्या उपस्थितीत हितधारकांशी चर्चा करण्यासाठी जनेप प्राधिकरणाला भेट दिली. रिकाम्या कंटेनर यार्डबाबतच्या चिंतेचे निराकरण करण्यासाठी, जनेप प्राधिकरणाने आपल्या आवारातील रिकाम्या कंटेनरच्या साठवणीसाठी सुमारे ३.५१ हेक्टर जागा निश्चित केली आहे.

आणखी एक रिकामे कंटेनर यार्ड विकसित करण्यासाठी २६.२० हेक्टर जागा निश्चित करण्यात आली आहे. ऑपरेटरच्या निवडीसाठी लवकरच निविदा काढली जाईल. एकूण ३० हेक्टर यार्डमध्ये रिकामे कंटेनर साठवण्यासाठी जमीन उपलब्ध होईल, ज्यामुळे व्यापाराकरीता बराचसा वेळ आणि खर्च वाचेल.

## दुखवटा

**बाळकृष्ण ठाकूर**



**उरण :** तालुक्यातील खोपटे द. पि. पाडा येथील बाळकृष्ण धनाजी ठाकूर (७८) यांचे नुकतेच निधन झाले. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्याबरोबर खोपटे गावाच्या पंचक्रोशीत जनसेवेत, मोलाचा वाटा असणाऱ्या अनंत ठाकूर यांचे ते ज्येष्ठ बंधू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, दोन भाऊ, दोन बहिणी, नातवंडे असा परिवार आहे.
त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.२९) श्रीक्षेत्र नाशिक पंचवटी येथे करण्यात येणार असून, उत्तरकार्य विधी गुरुवारी (दि.३१) खोपटे येथील राहत्या घरी होणार असल्याचे सांगण्यात आले.

## निवडक

### कळंबोलीतून तरुणी बेपत्ता



**पनवेल** : राहत्या घरात कोणास काही एक न सांगता एक १९ वर्षीय तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. खिडूकपाडा येथे राहणारी नम्रता उलवेकर (१९) ही राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे (०२२-२७४१३०००) किंवा पोलीस हवालदार पुजारी (८१६९४७४५२६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### खारघरमध्ये मोबाईल चोरीला

**पनवेल** : सोसायटीच्या बाहेर उभे असलेल्या ३७ वर्षीय इसमाच्या हातातील आयफोन चोरून नेल्याप्रकरणी चोरांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. महेश कासार हे सेक्टर ११ खारघर येथे राहतात. ते त्यांच्या सोसायटीच्या गेटसमोर उभे असताना पार्सलवाल्याला कॉल करण्यासाठी हातात आयफोन घेऊन उभे होते. या वेळी मोपेड गाडीवरून आलेल्या व्यक्तीने त्यांच्या हातातील आयफोन खेचून नेला.

### बेकायदा दारूविक्रीविरुद्ध कारवाई

**पनवेल** : खारघर वसाहत परिसरात बेकायदा विनापरवाना दारुविक्री केल्याप्रकरणी दोघा जणांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. कोपरा येथील एका घराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत गावठी दारू विक्री करीत असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. त्या वेळी ४० लिटर गावठी हातभट्टीची दारू ट्यूबमध्ये सापडून आली, तसेच खारघर वसाहतीमधील धनश्री किराणा स्टोअर सेक्टर १३, खारघर या ठिकाणी देशी-विदेशी दारूची विक्री होत असल्याची माहिती मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा, नवी मुंबई यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. या वेळी विविध प्रकारचे मद्य सापडले. दारू विक्रीचा परवाना नसल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार कारवाई करण्यात आली आहे.

### दिवाळीनिमित्त खरेदीला उधाण

**पनवेल** : पुढल्या आठवड्यात दिवाळी सण साजरा होणार असल्याने बाजारपेठांमध्ये खरेदीला उधाण आले आहे. दिवळीनिमित्त विविध प्रकारच्या पणत्या, आकर्षक आकाशकंदील, फराळाचे साहित्य, रांगोळी, कपडे खरेदीसाठी नागरिक मोठ्या संख्येने बाजारेपेठेत गर्दी करीत आहे.

# पनवेलमध्ये स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदारजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल मतदारसंघामध्ये मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता जनजागृती करण्यासाठी शुक्रवारी (दि.२५) महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार व स्वीप कार्यक्रम प्रमुख शहर अभियंता संजय कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली खारघरमध्ये प्रभाग समितीच्या वतीने प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले.





या प्रभातफेरीमध्ये सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, प्रभारी अधीक्षक जितेंद्र मढवी, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ही प्रभातफेरी खारघरमध्ये उत्सव चौक- शिल्प चौक-डेली बाजार-रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलपर्यंत काढण्यात आली. या प्रभातफेरी अंतर्गत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सायकल रॅली काढली. मतदान है सबकी जिम्मेदारी, छोडो आपने सारे काम पहले चलो करें मतदान, आपल्या मताचे दान आहे लोकशाहीची शान अशा घोषणा देत परिसर दुमदुमून टाकला. या वेळी प्रभातफेरीदरम्यान नागरिक, व्यावसायिक, फळ, भाजी विक्रेते या मतदारांमध्ये मतदान करण्यासाठी जनजागृती केली.

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेची निवडणूक होणार असून या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची अंमलबजावणी पनवेल अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यासाठी स्वीप पथक प्रमुख शहर अभियंता संजय कटेकर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिका हद्दीतील महाविद्यालयामध्ये तसेच शाळांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने, प्रभातफेरी, सायकल रॅली काढणे, वक्तृत्व, घोषवाक्ये, चित्रकला स्पर्धा घेणेबाबत नियोजन करण्यात येणार आहे. त्यानुसार खारघरमध्ये प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले.

### बैठकांमधून आवाहन

आयुक्तांच्या निर्देशानुसार व स्वीप प्रमुख शहर अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत डेएनयुएलएम विभागामार्फत काळुंद्रे येथे बचत गटातील महिलांकरिता बैठक घेण्यात आली.

## पनवेल पोलिसांची ऑलआऊट ऑपरेशन अंतर्गत कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी त्यांच्या हद्दीमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑलआऊट ऑपरेशन राबविले होते. या मोहिमेमध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदा व्यवसाय करणार्यांविरोधात वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या पथकाने कारवाई केल्याने अशाप्रकारे व्यवसाय करणार्‍यांचे धाबे दणाणले आहेत.

ऑलआऊट ऑपरेशन दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करीत हत्यार कायदा कलम ४, २५-१ गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच एनडीपीएस सेवन-४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गावठी दारू हातभट्टी विरोधात एका ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे, तसेच देशी विदेशी दारु विक्रीप्रकरणी एकावर कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दोन संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. नाकाबंदीदरम्यान १११ वाहने तपासण्यात आली व त्यापैकी २६ वाहनांवर मो.वा.का. अन्वये कारवाई करण्यात आली.

पनवेल परिसरातील दोन संवेदनशील ठिकाणे तपासण्यात आली. अभिलेखावरील एकूण १० आरोपी तपासण्यात आले. त्यापैकी तीन जण सापडले आहेत.

## गर्भाशयमुख कर्करोगाची तपासणी

**पनवेल** : अबोली महिला रिक्षा संघटनेतर्फे रिक्षाचालक महिलांसाठी गर्भाशयमुखाच्या कर्करोगाच्या तपासणीचे आयोजन मंगळवारी (दि.२९) नील हॉस्पिटल सेक्टर १ नवीन पनवेल येथे करण्यात आले आहे. यासाठी रिक्षाचालकाचे वय ३० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. त्यांनी एचपीव्ही टेस्ट करून घ्यावी. त्याचप्रमाणे गर्भाशय मुखाचा व कर्करोग टाळू शकतो का? मार्गदर्शक डॉ. शुभदा नील यांचे राहणार आहे. यासाठी संपर्क (७९०००४७६९२/ ९८३३८०१५७०) येथे करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडणुकीदरम्यान उरण पोलिसांचे सीआयएसएफ जवानांसह संचालन

**उरण : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत उरण मतदारसंघातील संवेदनशील असलेल्या मतदान केंद्रे, संवेदनशील परिसरात शुक्रवारी (दि.२५) सीआयएसएफ जवानांसह उरण पोलिसांनी संचलन केले.



जासई गाव ते रांजणपाडा रिक्षा स्टँड, नव्याने उदयास येत असलेल्या द्रोणागिरी नोड वसाहत, नवीन शेवा, उरण एसटी स्टॅन्ड, चारफाटा ते राजपाल नाका, जरी मरी मंदिर, उरण बाजारपेठ, मजीद मोहल्ला, वाणी आळी, स्वामी विवेकानंद चौक, बोरी व उरण न्यायालय रोड येथे संचलन करण्यात आले.

सदरचे संचालन सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहूल व उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सीआयएसएफ एक पोलीस निरीक्षक, दोन पोलीस उपनिरीक्षकांसह ५० जवान तसेच उरण पोलीस ठाण्याचे एक निरीक्षक, पाच सहाय्यक निरीक्षक, उपनिरीक्षक, २० अंमलदारांनी संचलन केले.

## उरण बाजारात दिवाळीनिमित्त आकर्षक आकाशकंदील

**उरण : वार्ताहर**

दिवाळीला थोडेच दिवस राहिल्याने आकाशकंदील, लाईटची तोरणे, पणत्या, रांगोळी, आकर्षक दिवे आदी वस्तूंनी उरण बाजारपेठ साजली आहे. बाजारपेठेतील गांधी चौक, राजपाल नाका आदी ठिकाणी रस्त्यालागत आकाशकंदील विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

राजपाल नाका येथील स्वराज ग्रुपच्या वतीने घाऊक दरात कंदील विकले जात आहेत. संजय म्हात्रे यांनी सांगितले, गेली कित्येक वर्षे आम्ही कंदील, रेडीमेड दिवे, रांगोळी विकतो. डिजिटल कंदील नागरिक पसंत करीत आहेत, असे सांगितले.



## सीकेटी ज्युनिअर महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयात (दि.२५) सायन्स विभागातर्फे शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. पं. स.चे गटशिक्षण अधिकारी सिताराम मोहिते, बीडिओ महेश मांढरे नायकवाडी हे पाहुणे उपस्थित होते.





चांगू काना ठाकूर संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांची उपस्थिती लाभली.

रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स खारघरचे भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक प्रथमेश उडेकर व वनस्पतीशास्त्र विषयाच्या प्रा. डॉ. पूजा लांजेकर या परीक्षकांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांचे परीक्षण केले.

ज्युनिअर कॉलेजच्या विज्ञान आणि वाणिज्य विभागातून ५० गटांनी या प्रदर्शनात सहभाग घेतला. सोलर कार, रेनबो फायर, ग्रोवोल्टिक सस्टेनेबल फॉर्मिंग, स्टारशीप टूपर गेम, टेस्ला कॉइल, क्लाऊड सीडींग, ईव्ही चार्जिंग, अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आपापले प्रकल्प सादर केले.

या सर्व विद्यार्थ्यांना विज्ञान व वाणिज्य विभागातील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## दोन वेगवेगळ्या अपघातात एक ठार, दोघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एकजण ठार झाला असून दोघे जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पनवेलजवळील राहूल पार्क हॉटेलसमोर पळस्पे फाटा येथे एका स्वीफ्ट डिझायर गाडीने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात सुरज वाकोडे (३० रा.डेरवली) व रजनी वाकोडे (२६) हे दोघे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दुसर्‍या अपघातात तळोजा परिसरात एका ट्रोला गाडी (एमएच ४६ बीयु २१९७)वरील चालकाने गाडी मागे घेत असताना चाकाचा धक्का शकील हबीब अहमद यांना लागला. या धडकेत त्यांना गंभीर दुखापती झाल्या. त्यांना एमजीएम हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. अपघाताची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली.

## पिरकोन येथे भाजपची बैठक

**उरण** : भाजपचे उरणचे उमेदवार आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ तालुका युवाध्यक्ष तेजेश पाटील, युवा नेते साहिल म्हात्रे, युवाध्यक्ष प्रवीण घासे, चिरनेर पंचायत गण अध्यक्ष पंकज म्हात्रे आणि आयटी सेलचे अध्यक्ष समीर पाटील यांची पिरकोन गावात उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या घरी बैठक झाली.

युवकांना उरण युवाध्यक्ष तेजस पाटील आणि त्यांच्या टीमने पिरकोनच्या युवकांना मार्गदर्शन केले. माजी जि. प. सदस्य जीवन गावंड यांनी सरकारी योजनांबाबत माहिती दिली. प्राचार्य प्रमोद म्हात्रे, माजी सरपंच के.वाय. गावंड, शिक्षक नेते हेमंत गावंड, अजित जोशी, ज्येष्ठ कार्यकर्ते रवी म्हात्रे, संजय जोशी, गोपाळ म्हात्रे, बलवंत गावंड यांनी आमदार महेश बालदी यांना जास्तीत जास्त मतदान करण्याबाबत आवाहन केले. या वेळी निशाल गावंड, हेमंत गावंड, पंकज गावंड, विशाल गावंड, कल्पेश गावंड, गिरीश गावंड, पंढरी गावंड, बंटी गावंड, राकेश गावंड, विशाल गावंड, प्रितेश गावंड आणि महेश गावंड आदी उपस्थित होते.



## बीसीटी लॉ कॉलेजमध्ये इंग्रजी व्याकरण सॉफ्ट स्किलवर कार्यशाळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात गुरुवारी (दि.२४) सेमिनार हॉलमध्ये विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व्याकरणावरील सॉफ्ट स्किल या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती.

कार्यशाळेचे आयोजन सहाय्यक प्रा. रवनिश बेक्टर यांनी प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन वैदेही वारे या विद्यार्थिनीने केले आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे आणि सेमिनार हॉलमध्ये उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले.

परिसंवादाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर वक्त्या डॉ. उषा मोरे यांचा परिचय सहाय्यक प्रा.राघव शर्मा यांनी केला. अतिथी वक्त्यांचा सत्कार सहाय्यक प्रा. संग्राम पवार आणि राघव शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला.

कायदेशीर क्षेत्रातील प्रभावी संवादासाठी आवश्यक असलेल्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष भाषण, सक्रिय आणि निष्क्रीय आवाज आणि तुलनेचे अंश यांसारख्या व्याकरणाच्या महत्त्वपूर्ण संकल्पनांवर लक्ष केंद्रित करून डॉ. उषा मोरे यांनी सादरीकरण केले.

संपूर्ण सत्रात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. शुभम चौबे हिने आभार प्रदर्शन केले.



## शासकीय कामात अडथळाप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

**पनवेल** : वीज बिल न भरल्याने मीटर काढून घेऊन येत असताना महिला विद्युत सहाय्यकाला धमकी आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

करंजाडे येथील वीजग्राहकांनी बिल न भरल्याने त्यांचे वीज मीटर काढण्यासाठी वायरमेन आणि महिला विद्युत सहाय्यक गेल्या. त्यांनी करंजाडे आर ३ येथील शिव मॅजेस्टिक बिल्डिंगमधील नऊ ग्राहकांचे वीज मीटर काढले. ते दोघे परत येण्यास निघाले असता सोसायटीतील शरद भोईर यांनी महिला विद्युत सहाय्यकाचा हात पकडून गेटच्या बाहेर जाण्यापासून थांबवले. मीटर परत बसून देण्यासाठी बघून घेण्याची धमकी देऊन शिवीगाळ केली, तसेच अमृत भोईर यांनीदेखील शिवीगाळ केली. एका रहिवाशाने ते बाहेर जाऊ नये म्हणून सोसायटीतील एक गेट बंद केले. घडलेला प्रकार वरिष्ठांना सांगितल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## दिवाळीनिमित्त पनवेलमध्ये महापालिकेतर्फे स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या वतीने स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी स्वच्छता मोहिमेस गुरुवारी (दि.२४) चारही प्रभागांमध्ये सुरुवात करण्यात आली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार या मोहिमेसाठी विशेष १५० सफाई कर्मचार्‍यांचे पथक नेमण्यात आले आहे. ही मोहीम मंगळवार (दि.२९)पर्यंत राबविण्यात येणार आहे.



चारही प्रभागातील मुख्य बाजारपेठ आणि आठवडे बाजार भरणार्‍या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली, तसेच भाजीविक्रेत्यांना दोन डस्टबीन देण्यात आले. वित्यांमध्ये प्लास्टिकबंदीविषयी जनजागृती करण्यात आली. स्वच्छ उद्यान अभियानांतर्गत शुक्रवारी (दि.२५) चारही प्रभागातील सार्वजनिक उद्याने, बागा आणि खेळाच्या मैदानांची संपूर्ण सफाई करणे, उद्याने, गार्डन आणि खेळाच्या मैदानाच्या परिसरातील अथवा प्रवेश रस्त्यावरील डेब्रिज उचलण्यात आले.

दिवाळीपूर्वी घरोघरी साफसफाई केली जाते. या वेळी अडगळीतील परंतु सुस्थितीतील कपडे, चपला, बूट, पुस्तके, स्कूलबॅग आदी वस्तू कचर्‍यात फेकण्यात येतात, अशा सुस्थितीतील वस्तू आरआरआर (रिसायल, रियुझ, रिड्युस) केंद्रामध्ये जमा करण्याबाबत नागरिकांना उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी आवाहन केले आहे.

संपादकीय

# मविआतील वाद चव्हाट्यावर

विरोधकांच्या महाविकास आघाडीत जागावाटपावरून गेले अनेक दिवस सुरू असलेला गोंधळ अद्यापही थांबलेला नाही. फॉर्म्युला ठरला, आता इतक्याच जागा उरल्या असे म्हणत मविआतील नेतेमंडळी रोज परस्परविरोधी विधाने करताना दिसत आहेत. हे सारे पाहता ही मंडळी एकत्र राहून राज्यकारभार कसा चालवतील हा एकच प्रश्न राज्यातील मतदारांना पडतो आहे.

**महाविकास आघाडीत गेले अनेक दिवस जागावाटपाच्या चर्चेच्या नावाखाली जो अभूतपूर्व गोंधळ सुरू आहे, त्याला म्हणायचे तरी काय? लोकसभा निवडणुकीत संविधानाविषयी खोटा प्रचार करून कथित यश मिळाल्यानंतर आघाडीतील नेतेमंडळी फुशारक्या मारू लागली होती. यात उबाठा गटाचे संजय राऊत आघाडीवर होते. जणु काही विधानसभा निवडणुकीत आपल्याच पक्षाची सत्ता येऊन उद्धव ठाकरे मुख्यमंत्रीपदी विराजमान होण्याचे नक्की झाल्याच्या थाटात त्यांच्या बतावण्या सुरू झाल्या होत्या. स्वत: उद्धव ठाकरे यांनीही आघाडीतील अन्य पक्षांकडे 'मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करा' असा लकडा लावून स्वत:चे हसे करून घेतले. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात सत्ता स्थापन करण्याच्या स्वप्नरंजनात गुंग झालेली ही मंडळी हरियाणातील विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर जमिनीवर आली. प्रत्यक्षात राज्यातील निवडणुकांची घोषणा झाल्यापासून तर ते एकमेकांशी जो काही 'सुसंवाद' साधत आहेत तो पाहता या आघाडीत कोणत्याही क्षणी बिघाडी होऊ शकेल असेच चित्र निर्माण झाले आहे. विशेषत: उबाठा आणि त्या खालोखाल काँग्रेस या दोन्ही पक्षांचे नेते उर्वरित पक्षांना विचारात न घेता परस्पर कोणत्याही घोषणा करीत आहेत आणि त्यांच्या या घोषणांना मग आघाडीतील इतर पक्षांकडून साफ धुडकावले जाते आहे. हे असे गेले काही दिवस रोज घडताना दिसते आहे. राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेले शरद पवार मात्र हा अवघा तमाशा शांतपणे पहात आहेत. मध्यंतरी उबाठा आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांमध्ये त्यांनी 'मध्यस्थी' केल्याच्या बातम्याही आल्या. त्यानंतर मविआच्या तिन्ही पक्षांमध्ये ८५-८५-८५चा फॉर्म्युला ठरल्याचे जाहीर करण्यात आले. परंतु तेही काही खरे नव्हते असे दोनच दिवसांत समोर आले. तिन्ही पक्षांनी ८५ जागा लढवण्याचे ठरले असले तरी काही जागांच्या बाबतीत आपापसात अदलाबदल होऊ शकते अशी विधाने अद्यापही सुरू आहेत. मध्यंतरी दोन दिवस संजय राऊत आणि नाना पटोले यांच्यातील वाद विकोपाला गेला. अखेर काँग्रेस पक्षाला चर्चेसाठी बाळासाहेब थोरात यांना पुढे करावे लागले. महाविकास आघाडीचा हा गोंधळ सुरू असताना महायुतीतील पक्षांनी मात्र आपापल्या उमेदवारांच्या याद्या जाहीर करून प्रचाराला नेटकी सुरुवात केली आहे. हरियाणातील भारतीय जनता पक्षाच्या जोरदार विजयामुळे आधीच हबकलेले विरोधक आता महायुतीने निवडणुकीच्या रिंगणात घेतलेली आघाडी पाहून केव्हाचेच पराभूत मानसिकतेत गेलेले दिसत आहेत, परंतु उगाच उसने अवसान आणून त्यांना किमान निवडणूक लढविण्याचा पवित्रा घ्यावा लागतो आहे असे दिसते. त्यामुळे शुक्रवारी पुन्हा नव्याने ९०-९०-९०च्या फॉर्म्युल्याची घोषणा मविआने केली खरी, मात्र त्याचवेळी ही आघाडी फुटणार असल्याचे दावेही अन्य काही नेते करत आहेत. दुसरीकडे जागावाटपातील विलंबामुळे मविआचा मित्रपक्ष असलेल्या समाजवादी पक्षानेही स्वबळावर लढण्याचा इशारा मविआला दिला आहे. या अशा आघाडीचे काय करायचे त्याचा सुयोग्य निर्णय आता राज्यातील जनतेलाच मतदान करतेवेळी घ्यावा लागणार आहे.**

# रांगोळी : मांगल्याची सिद्धी, सौंदर्याचा आविष्कार



लक्ष लक्ष दीप प्रज्वलित करीत जीवनात आनंदाचा प्रकाश निर्माण करणारा दिवाळी सण जवळ येऊन ठेपला आहे. गोरगरीब, श्रीमंत, व्यापारी, कष्टकरी हे सर्वजण भारतभर हा सण उत्साहात साजरा करतात. या सणाच्या काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी आपल्या डोळ्यासमोर येतात. पणत्या, दिवे पेटवून केलेली आरास, फटाक्यांचा धूम धडाका, उटण्याचा सुगंधी घमघमाट ,चविष्ट फराळ आणि या सर्वांच्या जोडीला घरासमोर अंगणात किंवा दरवाजासमोर, उंबरठ्यावर काढलेली सुंदर सुबक, आकर्षक रांगोळी.

रांगोळीचे मुळात आकृती प्रधान व वल्लरी प्रधान असे दोन मुख्य प्रकार आहेत. आकृती प्रधान रांगोळी भारतात सर्वत्र आढळते. आपल्याकडे तिला कण्यांची रांगोळी असंही म्हणतात. रांगोळी म्हणजे रंगाची ओळ, रंगाची रेघ, पावित्र्याचे प्रतिबिंब ,मूर्तीमंत श्रद्धेचे प्रतीक अशी रांगोळी शिरगोळ्यांच्या चुरणानेही काढतात. कोकणात भाताची फोलपटे जाळून त्याची पांढरी राख ही रांगोळी म्हणून वापरतात. शहरात किंवा बाजारात जी पांढरी रांगोळी मिळते ती संगमरवराची पूड असते. रांगोळी मुळे घर संस्कार संपन्न व मंगलमय सुशोभित होते. जमीन सारवल्यावर तिच्यावर रांगोळीच्या चार रेघा न विसरता ओढल्या जातात.

चित्ररूप, चित्रमय रांगोळी हे महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य. त्यामध्ये व्यक्तीचित्र, निसर्गदृश्य, प्राणी व वन्य जीवन ताज्या असामाजिक, राजकीय, आध्यात्मिक घडामोडी इत्यादी विषयावर रांगोळी चित्र काढली जातात व त्यातून वर्तमान काळाची प्रतिबिंब उमटू लागते. या रांगोळ्या बोधप्रद व आशयप्रधान होऊ लागतात व त्यातूनच समाजजागृतीचे महान कार्य घडते. चित्ररूप रांगोळी काढण्यासाठी थोडंफार चित्रकलेचे अंग असण्याची आवश्यकता असते. अशी रांगोळी काढताना गेरूची पार्श्वभूमी ठेवण्याची आवश्यकता नसते. कॅनवास म्हणून साधारण सपाट फरशी किंवा जमीन आवश्यक असते. त्यावर कागद लावून त्या कागदावर जुजवी स्केच काढून मग त्यावर रांगोळी भरली जाते. मुळात रांगोळीचे विविध रंग त्यांच्या उजळ, मध्यम, गडदरंग छटा तयार करणे हे सर्वात महत्त्वाचे काम असते. अशा रंग मिश्रणासाठी खास 'लेक कलर्स' वापरले जातात.

रंगांचे मिश्रण ही रांगोळीतली सर्वात महत्त्वाची बाब. सफेद रांगोळी ही बेस म्हणून वापरली जाते. रांगोळी साठी हवे असलेल्या रंगाचे मिश्रण आधी बनवून घ्यावे लागते. सफेद रांगोळी बरोबर हे रंग तळव्याने चांगले घासून घ्यायला दोन तास जातात. गडद रंगछटा करण्यासाठी काळा किंवा पर्शियन ब्लू (निळा) रंग वापरतात. उजळ छटांसाठी सफेद रांगोळी अधिक वापरली जाते. काळा रंग हा काजळीचा (व्हेजिटेबल रंग) असतो. त्याचा वापर जपून करावा लागतो.

रांगोळी काढताना साधारण अंगठा किंवा तर्जनीचा वापर केला जातो. या दोन बोटांच्या चिमटीत रांगोळी पकडून टाकली जाते. चित्रांच्या रांगोळी पार्श्वभूमीसाठी चहाच्या गाळणीसारखी गाळण वापरली जाते. रांगोळी सर्वत्र सारखी पडावी तसेच ती वेगाने अधिक भागात टाकता यावी यासाठी गाळणीचा उपयोग होतो. डोळे किंवा इतर सूक्ष्म आकारांच्या रांगोळीसाठी मात्र हाताच्या चिमटीत आवश्यक तेवढीच रांगोळी घेऊन बारीक पूड सोडावी लागते. पांढरी रांगोळी कमी व वस्त्रगाळ रंग रांगोळी घेऊन हात आकृती प्रमाणे वळवावा लागतो. चिमूट आणि चाळणी व्यतिरिक्त रांगोळी फेकली जाते. व्यक्ती चित्रातल्या शेड साठी किंवा काही रंग पसरवून टाकण्यासाठी छोटा झटका देऊन रांगोळी गोलाकार पद्धतीने फेकली जाते. अशा प्रकारे रांगोळी फेकल्यावर ती वर्तुळाकार परिघात पसरून पडते. त्यामुळे सलग रंगछटा मिळते.

प्रदर्शनाच्या ठिकाणी रांगोळी काढताना कलाकाराला अक्षरशः घाम गाळावा लागतो. एक तर रांगोळी काढताना हॉल हवाबंद ठेवावा लागतो. रांगोळीतला दमटपणा व हॉलमधील अंधार नाहीसा करण्यासाठी हॉलमध्ये मोठे बल्ब जळते ठेवावे लागतात. त्यामुळे कलाकारांना घाम येतो. हा घाम रांगोळीवर पडू नये याची दक्षता घेऊन कमीत कमी तीन ते चार तास कष्ट करून उत्कृष्ट रांगोळी कलाकृती सादर करावी लागते. रांगोळी काढताना एक गोष्ट सर्वात महत्त्वाची असते ती म्हणजे इथे दुरुस्तीला अजिबात वाव नाही. कुठल्याही प्रकारची दुरुस्ती होऊ शकत नाही. मग एक तर संपूर्ण रांगोळी पुसून पुन्हा नव्याने सुरुवात करणे एवढा मार्ग असतो. रांगोळी पूर्ण झाल्यावर बॉर्डरही महत्त्वाची असते. साधारण चित्राला सफेद रांगोळीची बॉर्डर देण्याची पद्धत आहे किंवा चित्राला शोभेशी अशी पूरक रंगाची बॉर्डर देतात.

काळानुसार आता विविध माध्यमांचा वापर करून रांगोळी प्रकार वाढीस लागले आहेत. विविध धान्यांचा वापर करून रांगोळी रेखाटने, तसेच विविध पाने फुले यांचा रंग, आकार, पोत या गोष्टीचा कल्पकतेने वापर करून आकर्षक रांगोळी काढणे. 'एम्बॉसिंग', अर्थात उठावाची रांगोळी हा आणखी एक वेगळा प्रकार रांगोळी उंच सकल पद्धतीने टाकून तिला त्रिमित रूप दिले जाते व ती रांगोळी शिल्पाप्रमाणे भासते. मिठाची रांगोळी तसेच पाण्यावर व पाण्याखालची रांगोळी या प्रकाराकडे आजही अप्रूप म्हणून पाहिले जाते तसेच हाईटवर प्रकाशमान होणारी रांगोळी हा नवीन प्रकार रांगोळीत यशस्वी होत आहे.


रांगोळीला आपल्या संस्कृतीत पवित्र अधिष्ठान असले तरी एक कला म्हणून आजही अवघड तंत्रामुळे व अपार मेहनतीचा कलाप्रकार तसेच आर्थिक समस्या व राजाश्रयाचा अभाव या रांगोळीच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या गोष्टी, पण रंगावली कलाकारांची खरी दखल जनतेने घेतली ती रंगवली प्रदर्शने भरविल्यानंतरच किंबहुना रांगोळी कलाकारांनी सादर केलेला हा सामुदायिक प्रयत्न चित्ररूप रांगोळीला प्रगतीपथावर नेण्यास कारणीभूत ठरला यात शंका नाही.

**-नंदकुमार साळवी**

# विनोदवीर लक्ष्मीकांत बेंडे

मराठी चित्रपटसृष्टीमध्ये आजवर अनेक गुणी कलाकारांनी त्यांच्या अभिनयामुळे प्रेक्षकांची मनं जिंकली. या साऱ्या उत्तम कलाकारांच्या गर्दीत आजही एक नाव कायम अग्रस्थानी आहे ते म्हणजे दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे. आज लक्ष्मीकांत यांचा स्मृतिदिन. त्यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी मुंबईत झाला. बालपण दक्षिण मुंबईतील चिखलवाडी येथे गेले. त्यांचा अभिनय आधीपासून सर्वांना आवडणारा होता.

मुंबईतील गिरगावमधील कुंभारवाड्यात लहानाचे मोठे झालेल्या लक्ष्मीकांत यांनी युनियन हायस्कूलमध्ये त्यांचं शालेय शिक्षण पूर्ण केलं, तर भवन्स कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेतलं. याचदरम्यान कॉलेजमध्ये असताना ते एकांकिकांमध्ये भाग घेत होते. अनेक वेळा साहित्य संघ मंदिरात त्यांनी बॅक स्टेजवरही काम केलं. हा प्रवास सुरू असतानाच त्यांच्या 'टूरटूर' या नाटकाने यशाचं शिखर गाठलं. त्यानंतर त्यांना महेश कोठारेंच्या 'धुमधडाका' (१९८५) या चित्रपटातून मोठा ब्रेक मिळाला. 'टूरटूर' आणि 'धुमधडाका' या दोन्ही



माध्यमातून त्यांनी आपले अष्टपैलुत्व दाखवून प्रचंड लोकप्रियता मिळवली.

नाटकाच्या माध्यमातून थेट प्रेक्षकांपर्यंत पोहचता येते म्हणून त्यांनी 'कार्टी उडाली भुर्र' स्वीकारले. मराठी नाटक, चित्रपटांचा हा प्रवास सुरू असतानाच 'मैने प्यार किया' या चित्रपटामधून त्यांचा हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश झाला. त्यानंतर 'साजन', 'हम आपके हैं कौन' इत्यादींत त्यांनी काम केले.

मराठीत 'दे दणादण', 'अशी ही बनवाबनवी', 'थरथराट', 'धडाकेबाज', 'हमाल दे धमाल', 'रंगत संगत', 'पटली रे पटली' असे करत करत ते डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'एक होता विदूषक' (१९९२)पर्यंत पोहचले. त्यांच्या कारकीर्दीतील हा खूपच महत्त्वाचा टप्पा. जोडीला वर्षा उसगावकर, दिलीप प्रभावळकर, निळू फुले, मधु कांबिकर, उषा नाईक, पूजा पवार, विजय चव्हाण अशा तगड्या कलाकार मंडळींची साथही त्यांना मिळाली होती.

बहुतेक चित्रपटांमध्ये त्यांनी दिग्दर्शक-अभिनेता महेश कोठारे यांच्याबरोबर किंवा अभिनेता अशोक सराफ यांच्यासोबत अभिनय केला होता. १६ डिसेंबर २००४ रोजी लक्ष्मीकांत यांनी जगाचा निरोप घेतला, पण ते आजही स्मरणात आहेत.

## बदलते तंत्रज्ञान

# 'हे' १० स्मार्टफोन स्वस्तात खरेदी करा

फ्लिपकार्ट बिग दिवाळी सेल २१ ऑक्टोबरला सुरू झाला आहे. अर्थात, त्यामध्ये 'प्लस मेंबर्स'ना २० ऑक्टोबरपासूनच प्रवेश देण्यात आला आहे. हा सेल अलीकडील बिग बिलियन डेज सेलप्रमाणेच स्मार्टफोन्सवर ऑफर्स देणार आहे. फ्लिपकार्टचा दावा आहे की, अत्यंत कमी किमतीत स्मार्टफोन मिळविण्याची ही अंतिम संधी तुमच्याकडे चालून आली आहे, कारण हा सेल २१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत असणार आहे.




तुम्ही फ्लिपकार्ट बिग दिवाळी सेलमध्ये एसबीआय कार्डद्वारे एखादी वस्तू खरेदी केल्यास तुम्हाला १० टक्के कॅशबॅक किंवा सवलतीचा आनंद मिळू शकतो तसेच फ्लिपकार्ट ॲक्सिस बँक कार्ड वापरल्यास कोणत्याही खरेदीवर अतिरिक्त पाच टक्के अमर्यादित कॅशबॅकसुद्धा मिळेल.

कमी किमतीत उपलब्ध असलेले लोकप्रिय स्मार्टफोन्स

१. मोटोरोला जी८५ ५जी स्मार्टफोन १५ हजार ९९९ रुपयांच्या सुरुवातीच्या किमतीत उपलब्ध आहे.

२. सॅमसंग गॅलेक्सी एस२३ ५जी स्मार्टफोन ३७ हजार ९९९ रुपयांच्या सुरुवातीच्या किमतीत उपलब्ध आहे.

३. रिअलमी १२ एक्स ५जी स्मार्टफोन सात हजार रुपयांच्या सवलतीसह १० हजार ९९९ रुपयांमध्ये उपलब्ध आहे.

४. ओपो के१२ एक्स ५ जी स्मार्टफोन सहा हजार रुपयांच्या सवलतीसह १० हजार ९९९ रुपयांमध्ये उपलब्ध आहे.

५. सीएमएफ फोन सात हजार ५०० रुपयांच्या रुपयांच्या सवलतीसह १२ हजार ९९९ रुपयांना उपलब्ध आहे.

६. पोकोचा एफ६ ५जी हा ३३ हजार ९९ रुपये इतकी मूळ किंमत असलेला फोन तुम्हाला २२ हजार ९९९ रुपयांमध्ये खरेदी करता येईल.

७. विवो टी३ ५जी फोनची किंमत सात हजार रुपयांच्या सवलतीसह १५ हजार ९९९ रुपयांना उपलब्ध आहे.


८. सॅमसंग गॅलेक्सी एस २३ एफईची किंमत २८ हजार ९९९ रुपये आहे.

९. गुगल पिक्सेल ८ हा ७५ हजार ९९९ रुपये इतक्या मूळ किमतीपासून सुरू होणारा फोन तुम्हाला या सेलमध्ये ३६ हजार ४९९ रुपयांना खरेदी करता येईल.

१०. रिअलमी पी२ प्रो ५ जी सात हजार रुपयांच्या सवलतीसह १८ हजार ९९९ रुपयांमध्ये उपलब्ध आहे.

# प्रतिभावंत संगीतकार हृदयनाथ मंगेशकर

हृदयनाथ मंगेशकर हे मराठी व हिंदी भावसंगीत तसेच चित्रपटसंगीत यांतील ख्यातनाम संगीतकार व गायक. त्यांचा जन्म २६ ऑक्टोबर १९३७ रोजी प्रख्यात गायक नट मास्टर दीनानाथ मंगेशकर व शुद्धमती उर्फ माई या दाम्पत्यापोटी पुणे येथे झाला. दीनानाथ यांच्या अपत्यांमध्ये हृदयनाथ हे सर्वांत धाकटे (पाचवे) अपत्य. भारतरत्न लता मंगेशकर या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या गायिका हृदयनाथांच्या सर्वांत ज्येष्ठ भगिनी आहेत. तसेच गायिका आशा भोसले, मीना खडीकर व उषा मंगेशकर या त्यांच्या इतर भगिनी संगीतक्षेत्रात प्रसिद्ध आहेत. हृदयनाथांच्या बालपणीच दीनानाथांचे निधन (१९४२) झाल्याने त्यांना वडलांचा फारसा सहवास व प्रत्यक्ष तालीम मिळाली नाही; पण वंशपरंपरेने आलेला संगीतवारसा, शास्त्रीय संगीताची उस्ताद अमीरखाँ यांच्याकडून घेतलेली तालीम, आपल्या समकालीन संगीतकारांच्या स्वररचनांचा हृदयनाथांनी केलेला अभ्यास व स्वतंत्र प्रतिभा यामुळे सुरुवातीपासूनच हृदयनाथांची एक वेगळी संगीतशैली आकारास आली. त्यांनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी 'निसदिन बरसात नैन हमारे' व 'बरसे बुंदिया सावन की' या भक्तिगीतांना स्वरसाज चढविला.



निमित्त

संगीतकार सलील चौधरी यांना गुरुस्थानी मानणार्या हृदयनाथांना त्या वेळच्या बहुतेक सर्व महत्वाच्या संगीतकारांचा सहवास व काहींची मैत्री लाभली; त्यामुळे त्यांची मुळचीच वेगळी संगीतशैली अधिक विकसित व वैविध्यपूर्ण होत गेली. या शैलीमध्ये भारतीय शास्त्रीय संगीत, लोकसंगीत तसेच पाश्चिमात्य संगीत यांचा मिलाफ होतो. या शैलीने विशेषत: भावसंगीताच्या परंपरेला एक सुरेल छेद देऊन, रसिकांसमोर सुरांचे, लयीचे व भावांचे एक वेगळे प्रकटीकरण सिद्ध केले. कशी काळ नागिणी, चांदणे शिंपीत जाशी, तिन्हीसांजा सखे मिळाल्या, दे मला गे चंद्रिके, ये रे घना, जिवलगा राहिले दूर घर माझे, घनतमीं शुक्र राज्य करी, माझे गाणे, ही वाट दूर जाते अशी कित्येक गीते याचे उदाहरण म्हणून सांगता येतील.

हृदयनाथांनी आपल्या विस्तृत संगीत अवकाशामध्ये संत ज्ञानेश्वर, मीराबाई, सूरदास, कबीर आदी संतकवींबरोबरच भा. रा. तांबे, गोविंदाग्रज, स्वा. सावरकर आदी स्वातंत्र्यपूर्व काळातील कवी तसेच आरती प्रभू, सुरेश भट, ग्रेस, शांता शेळके, ना. धों. महानोर आदी स्वातंत्र्योत्तर आधुनिक कवी यांच्या विविध रचनांचा समावेश केला. या सर्वांच्या रचनांमधील वैविध्य व विभिन्न भाव समर्थतेने रसिकांपर्यंत पोहोचवले, हे त्यांच्या संगीत-कारकिर्दीतील मोठे यश व सुगम संगीतक्षेत्राला त्यांच्याकडून मिळालेले मोठे योगदान होय. अशा सर्व कवींच्या काव्यातील शब्दांपलीकडचे अमूर्त भाव वेगळ्या सांगीतिक हाताळणीसह स्पंदनशील व श्रुतिप्रधान संगीतरचनांमधून अभिव्यक्त करणे हे त्यांच्या संगीताचे मोठे वैशिष्ट्य आहे.

हृदयनाथांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यामध्ये लेकिन या हिंदी चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनासाठी राष्ट्रीय पुरस्कार (१९९०), पं. भीमसेन जोशी व पं. जसराज यांच्या हस्ते 'पंडित' ही पदवी, शंकराचार्यांकडून 'भावगंधर्व' ही पदवी, शासनाकडून 'पद्मश्री' पुरस्कार (२००९), सूरसिंगार हे पारितोषिक यांचा समावेश आहे.

क्लिक...क्लिक...!



पनवेल : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आकर्षक पणत्या, दिवे विक्रीसाठी आले असून बाजारपेठ सजली आहे.

## आरोग्य प्रहर

# मोड आलेली मेथी किती प्रमाणात खावी?

आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असलेली मोड आलेली मेथी आहारात प्रमुख स्थानी आहे. जिंदाल नेचरक्योर इन्स्टिट्यूटच्या मुख्य आहारतज्ञ सुषमा पीएस यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. मोड आलेली मेथी हे आवश्यक जीवनसत्त्व, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सच्या केंद्रस्थानी आहेत. तसेच हे व्हिटॅमिन-सी, ए ने समृद्ध असून जे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी फायदेशीर आहे.



पचनासाठी फायदेशीर

मोड आलेल्या मेथीमधील उच्च फायबर सामग्री पचनास मदत करून आणि कफ रोखून निरोगी पचन तंत्राला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

रक्तातील साखरेचे व्यवस्थापन

मोड आलेली मेथी रक्तातील साखर नियंत्रित ठेवते. हे मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी फायदेशीर आहे.

संरक्षण

मोड आलेली मेथी अँटिऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी कंपाऊंडने परिपूर्ण असतात, जे संपूर्ण शरीरातील सूज कमी करण्यास फायदेशीर आणि विविध आरोग्य समस्या कमी करण्यासाठी योगदान ठरू शकते.

हृदय-निरोगी आणि वजन नियंत्रणात ठेवते

अंकुरीत मेथी कोलेस्ट्रॉलची क्षमता कमी करण्यास फायदेशीर ठरू शकते, जे हृदयविकारापासून बचाव करतात. तसेच कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असल्यामुळे मोड आलेली मेथी परिपूर्णतेची भावना वाढवू शकते.

रोगप्रतिकारशक्ती आणि हाडांसाठी फायदेशीर

मोड आलेली मेथी शरीरात संरचना असलेले व्हिटॅमिन-सी तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते, मोड आलेल्या मेथीमध्ये फायटोएस्ट्रोजन गुण असतात, जे हार्मोनल समतोल राखतात. मोड आलेली मेथी हे कॅल्शियम आणि इतर खनिजांचे साधन आहेत, जे मजबूत हाडांसाठी फायदेशीर आहे.

मोड आलेली मेथी खाण्यापूर्वी या गोष्टींची घ्या काळजी

मोड आलेली मेथी खाण्याचे अनेक फायदे असले तरी मोड आलेली मेथी प्रत्येकासाठी फायदेशीर असू शकत नाही. आहारातील कोणताही बदल करण्यापूर्वी आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

गर्भवती महिलांनी तसेच ॲलर्जी असणाऱ्या व्यक्तींनीही मोड आलेल्या मेथीचे सेवन करण्यापूर्वी काळजी घ्यावी. याच्या अतिसेवनाने पोट फुगणे आणि गॅसची समस्या उद्भवू शकते.

# माथेरानमधील जंगल पुन्हा बहरले

## हवेत शुद्धता आणि गारवा; पर्यटकांसह स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान जुलै २००५मध्ये जोरदार पावसामुळे माथेरानमध्ये भूस्खलन झाले होते. सदाहरित असलेला भाग ओसाड झाला. रस्ते वाहून गेले, रेल्वेरूळ दरीलगत लटकत होते. येणारा मार्ग बंद झाला, लोकांना संकटाला सामोरे जावे लागले. अंदाजे एक हजार मिमी पावसामुळे सखाराम तुकाराम पॉईंटजवळील २०० मीटर जमीन झाडांसह भूस्खलन होऊन वाहून गेली. चार हजारांपेक्षा जास्त झाडे वाहून गेली. येथे पुन्हा झाडे उगवतील आणि हा परिसर सदाहरित होईल, असे वाटत नव्हते, पण निसर्गाने या आपत्तीवर मात करीत हा परिसर सदाहरित केला.

माथेरान म्हणजे डोंगरदाऱ्या आणि चढ-उताराचा भाग आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा लवकर होतो, पण २६ जुलै २००५मध्ये कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे येथे पहावे तिकडे पाणीच पाणी आणि मिळेल त्या मार्गाने पाण्याचा निचरा होत होता. इंदिरा नगर भागात घराचा एक भाग वाहून गेला. बहुतांश भागात भूस्खलन झाले. मुख्य रस्ता वाहून गेला होता. पाण्याचा प्रवाह इतका मोठा होता की, त्या प्रवाहात रेल्वे रूळ वाहत जाऊन दरीमध्ये लटकत होते, पण १९ वर्षांनंतर माथेरानमधील विदारक चित्र बदलेले असून मोठी, उंच झाडे याठिकाणी उगवली आहेत. जो भाग ओसाड पडला होता तिथे घनदाट जंगल तयार झाले आहे. अनेक जनावरांचा वावर या



जंगलात पहावयास मिळत आहे.

हा भाग हरित करण्यासाठी याठिकाणी मध्य रेल्वे व एमएमआरडीएची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. २६ जुलै २००५मध्ये नेरळ ते माथेरान या २१ किमी अंतरावर जवळजवळ ३५ ठिकाणी भूस्खलन झाले होते, तर काही ठिकाणी दरडी पडल्या होत्या, पण मध्य रेल्वेने युद्धपातळीवर काम सुरू केले. नवीन गटारे, भूस्खलन झालेल्या ठिकाणी नवीन बांधकाम करून हा मार्ग तयार करण्यात आला. सुरक्षा कठडे बांधण्यात आले. सुरक्षा रेलिंग टाकण्यात आले. अमन लॉज स्थानकापुढे रुळाखालील वाहून गेलेली जमीन मातीचा व दगडांचा भराव टाकून एकसमान करण्यात आली. या गॅबियनमुळे जंगल वाढण्यास मदत झाली.

> **२६ जुलै २००५ला आमच्या मोठ्या झाडांसहित जमीन वाहून गेली होती. एक वेळ असे वाटले होते की, हा भाग आता उजाडच राहील, पण आज १९ वर्षांनंतर हे जंगल पुन्हा बहरले. यासाठी मध्य रेल्वे त्याचबरोबर एमएमआरडीएचे करावे तेवढे कौतुक कमी आहे.**
> **-केतन रामाणे, स्थानिक**

## निवडक



### दीपक पाटील यांना पुरस्कार

**माणगाव** : अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील ज्येष्ठ पत्रकार दीपक पाटील यांना उल्लेखनीय कार्याबद्दल पत्रकार भूषण पुरस्काराने सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे. दीपक पाटील हे गेली अनेक वर्षे अलिबाग तालुक्यात पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाची सेवा करीत आहेत. विविध प्रश्न, समस्या यांवर त्यांनी आपल्या लेखणीने आवाज उठवून लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधले आहे.

### माणगाव येथून विवाहिता बेपत्ता

**माणगाव** : तालुक्यातील खरबाचीवाडी आदिवासीवाडी येथील विवाहित महिला राहते घरातून मंगळवारी (दि.२२)



निघून गेली आहे. या घटनेची फिर्याद मंगल लहू जगताप (वय ३८, रा. आदिवासीवाडी) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. फिर्यादी मंगल जगताप यांची मुलगी रुचिता सुनील जाधव (वय २२, रा. खरबाचीवाडी आदिवासीवाडी) ही तिचा पती झोपलेला असताना घरातून कोणाला काही एक न सांगता निघून गेली असून ती अद्यापपर्यंत घरी परतलेली नाही. बेपत्ता महिलेचा चेहरा उभट, रंग गोरा, उंची अंदाजे पाच फूट, अंगाने सडपातळ, पिवळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस, गळ्यात दोन लहान मंगळसूत्र घातले आहे. ही महिला कोणाला दिसल्यास सहाय्यक फौजदार निमकर (९८८१०२०२४४) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मुरूड महावितरणतर्फे मुलांना फराळवाटप

**मुरूड** : मजगाव व मुरूड महावितरणतर्फे उसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील बेलिवाडी येथील आदिवासीवाडी त्याचप्रमाणे तेलवडे ग्रामपंचायत हद्दीत असणारी टक्का आदिवासीवाडीमधील मुलांना दिवाळी फराळ, पेन, वह्यावाटप करण्यात आले. या वेळी महावितरणचे तालुका उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी, कनिष्ठ अभियंता, मजगांव शाखा प्रियांका सूर्यवंशी, ग्रामीण शाखा कनिष्ठ अभियंता सतीश खरात, कोकबन शाखा कनिष्ठ अभियंता संदेश होंडे, सहाय्यक लेखापाल विनायक ताजवे, उच्चस्तर लिपिक सुप्रिया साष्टे, प्रधान तंत्रज्ञ आत्माराम नांदगावकर, विद्युत सहाय्यक शैलेश काकडे, बाह्यस्रोत कर्मचारी गौरी राठोड, प्रणित वाडकर, गौरी अपराध आदी उपस्थित होते.



# प्रामाणिकपणे काम केल्याने मतदार माझ्यासोबत -आमदार महेंद्र दळवी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

गेल्या पाच वर्षांत आमदार म्हणून प्रामाणिकपणे काम केले, लोकांची सेवा केली. त्याची पोचपावती येत्या निवडणुकीत निश्चित मिळेल, असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी चौल विभागीय महायुतीच्या सभेत व्यक्त केला.

चौल बागमळा येथे महायुतीचे आमदार महेंद्र दळवी यांचे प्रचारार्थ सभा नुकतीच झाली. या वेळी मुंबई महानगरपालिकेचे माजी सभापती मंगेश सातमकर, शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, तालुकाध्यक्ष अनंत गोंधळी, भाजप तालुकाध्यक्ष उदय काठे, माजी अध्यक्ष हेमंत दांडेकर, भाजप ज्येष्ठ पदाधिकारी सतिश लेले, शिवसेना जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे, जिल्हा उपाध्यक्ष शैलेश चव्हाण, राष्ट्रवादी जिल्हा सचिव आशिष भट, चौल राष्ट्रवादी नेते प्रवीण राउत, ज्येष्ठ नेत्या जुलेखा तांडेल, माजी जि.प.सदस्य बाळाशेठ तेलंगे, शरद गोंधळी, भाजपचे दिलीप पटेल, चंपावती पतसंस्थेचे चेअरमन विश्वास जोशी, जिल्हा महिला संघटिका संजिवनी नाईक, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, प्रशांत शेणवईकर, हर्षल घरत, भुषण घरत, संकेत राउत, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होत.

अल्पसंख्याक आघाडीच्या रूही तांडेल-घोले, महिला आघाडीच्या जितेश्री पाटील, भाजपचे माजी अध्यक्ष हेमंत दांडेकर, माजी जि.प. सदस्य बाळाशेठ तेलंगे, तसेच मुंबईचे माजी नगरसेवक मंगेश सातमकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# तळवली शाळेतील विद्यार्थ्यांनी फुलविला भाजीचा मळा

**खोपोली : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा यासाठी राजिप शाळा तळवलीने परसबागेत भेंडी, भोपळा, अळू, वांगी, मिर्ची, घेवडा, टॉमेटो आदी भाज्यांची लागवड करण्यात आली.

प्रधानमंत्री पोषण शक्तीनिर्माण योजनेंतर्गत उत्कृष्ट परसबाग म्हणून राजिप शाळा तळवली, तालुकास्तरीय तृतीय क्रमांक मिळविला आहे. आज मराठी शाळा कुठेही कमी नाही. शिवाय त्या आता डिजिटल होत



असून विद्यार्थ्यांना घडविण्याचे योगदान शिक्षक वर्ग करीत आहे, तसेच त्यांच्या आरोग्याविषयी काळजी घेतली जाते. शाळेमधून निघणारा ओला व सुका कचरा वेगळा करून त्यापासून गांडूळ खत उपक्रम हाती घेऊन परसबागेची निर्मिती करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांना रोजच्या जेवणात पालेभाज्यांचा आहार मिळत आहे.

गटशिक्षणाधिकारी चोरामले, पोषण आहार अधीक्षक दिपा परब, माजगाव केंद्राचे केंद्रप्रमुख जे.पी.परदेशी यांनी कौतुक केले. मुख्याध्यापिका मंगल मुंढे, शिक्षक मस्तान बोरगे यांनी परसबाग निर्मितीसाठी मोठे योगदान दिले. व्यवस्थापन समितीकडून तृतीय क्रमांक प्राप्त झाल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते अतुल मालकर यांनी अभिनंदन केले.

# पोलादपुरात लाभार्थ्यांची नावे डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्याची मोहीम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तहसीलदार कपिल घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची नावे डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्याची मोहीम गतिमान करण्यात आली आहे.

संजय गांधी निराधार योजनेच्या संजय गांधी निराधार योजना अनुदान आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना यांच्या ग्रामीण व दुर्गम भागातील लाभार्थ्यांना डीबीटी पोर्टलद्वारे अर्थसहाय्याचे वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वाकण तलाठी सजेच्या पाच वाड्यांमध्ये तलाठी किरण जाधव यांनी डीबीटी ऑपरेटरच्या मदतीने ग्रामीण व दूर्गम भागातील लाभार्थ्यांची माहिती अपलोड केली असून पोलादपूर तालुक्यामध्ये सर्वत्र ही मोहिम युद्धपातळीवर राबविण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार कपिल घोरपडे यांनी दिली.


### कागदपत्रे हरविलेबाबत

मी, श्रीमती तक्षशीला अमरीश चलवारी, राहणार श्रीसाईकृपा को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, सदनिका क्रमांक ब-१०१, मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नंबर ६४, ओल्ड पनवेल, महाराष्ट्र ४१० २०६.

माझेकडून कुर्ला, नेहरुनगर येथे प्रवास करीत असताना माझेकडून खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी कुर्ला नेहरुनगर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग केसचा रजि. नं. १२८०५७/२०२४, दिनांक २३/१०/२०२४ रोजी केली नोंद आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**
श्रीसाईकृपा को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, सदनिका क्रमांक ब-१०१ यांची शेअर सर्टिफिकेट नंबर २० शेअर्सचे भाग ५६ ते ६० आहेत. वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९५९४०४६७९९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दिनांक : २४/१०/२०२४

**सही/-**
(श्रीमती तक्षशीला अमरीश चलवारी)


# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यामुळे जिल्ह्यात मोठ्या संख्येने वाहनांची वर्दळ वाढली आहे. त्याचप्रमाणे पर्यटन हंगामही सुरू आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांवर करडी नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (दि.२४) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ४१० चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख ९५ हजार १०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत. निवडणुकीचा काळ असल्याने नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, कोणतीही अवैध वाहतूक करू नये, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात येत आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही जमिन मालक **दशरथ धावजी मते, रमा धावजी मते, देऊबाई पांडूरंग घरत, आनंदी पुलाजी घरत, पार्वती रघुनाथ घरत, ठकूबाई मोरेश्वर ठाकूर, राधाबाई अमृत मते, चंद्रकांत अमृत मते, विजय अमृत मते, वच्छला बाबुराव भोईर, प्रल्हाद हरिश्चंद्र ठाकूर, कांतीलाल हरिश्चंद्र ठाकूर, विमल कृष्णा घरत, जयश्री रघुनाथ पाटील, निर्मला काना नाईक, रंजना रत्नाकर म्हात्रे, साधना प्रकाश ठाकूर, मीना प्रकाश ठाकूर, स्नेहल प्रकाश ठाकूर, स्वाती प्रविण म्हात्रे, पार्वती अरुण मते, आनंद अरुण मते, रंजनी अरुण मते** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - पौंडखार, तालुका - उरण, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३/२ | ०-२८-३०<br>पो.ख. ०-०२-३०<br>एकूण ०-३०-६०<br>पैकी ०-२७-५४ | २.३२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल. दि. २५/१०/२०२४.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक **१. सुदाम कोंडू ठाकुर २. पांडुरंग कोंडू ठाकूर ३. ताई एकनाथ ठाकुर ४. अनिल एकनाथ ठाकुर ५. अंजना बाळाराम शिर्के ६. कमलेश एकनाथ ठाकुर** या जमीन मालकाकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर शेती मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौज-भाताण, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| गावाचे नाव | गट.नं. /हि. न. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| भाताण | ९३/२ | ०-६६-००<br>पैकी ०-३०-०० क्षेत्राबाबत सदर जाहीर नोटीस | १३.२५ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या शेती जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/१०/२०२४

**सही/-**
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**
पत्ता : डी-३/१, किनारा हौ.सो. बावन बंगला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो.९८२०७९५६०५

### कुळगांव बदलापूर नगर परिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

संदर्भ : कुबनप/आरोग्य/१५०/२०२४-२५ दिनांक :- २५/१०/२०२४

#### जाहीर आवाहन

कुळगांव-बदलापूर नगरपरिषद मार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत बदलापूर शहरामध्ये विविध पर्यावरणपुरक उपक्रम राबविले जात आहे. या अभियानांतर्गत शहरामध्ये फटाकेमुक्त व पर्यावरणपुरक हरित सण उत्सव राबिवले जात आहे. तरी बदलापूर शहरातील सर्व नागरिकांना याव्दारे सुचित करण्यात येते की, शहरामध्ये प्रदुषण होणार नाही यासाठी प्रदूषणमुक्त, फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी सण साजरा करावा व स्वच्छ सर्वेक्षण तसेच माझी वसुंधरा अभियानामध्ये सहभागी होऊन बदलापूर नगरपरिषदेस सहकार्य करावे.

**दिवाळी सण साजरा करताना खालील सुचनांचे पालन करणे.**

- दिवाळीमध्ये वापरण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण तसेच हानिकारक वायू निघाल्याने वायु प्रदुषण होते हे पर्यावरण व मानवी आरोग्यास हानिकारक आहे. त्यामुळे फटाकेमुक्त व प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी.
- दिवाळीमधील सण समारंभामध्ये प्लास्टिकचा वापर टाळुन कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा.
- दिवाळी सणाच्या उत्सवामध्ये सुशोभिकरण करण्याकरिता प्लास्टिकमुक्त वस्तुचा वापर करावा व जास्तीत-जास्त झाडे लावुन पर्यावरणपुरक दिवाळी सण साजरा करण्यावर भर द्यावा.
- घरामध्ये तयार होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे घरगुती कंपोस्ट खत तयार करण्यावर भर देऊन त्या खताचा उपयोग आपल्या घराभोवती परसबागेत करावा.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

#### जाहीर सूचना

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ कुळगाव बदलापूर नगरपरिषद सर्व्हिस लेबल बेंचमार्क (SLB) व कुळगाव बदलापूर शहरात पुरवल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा हा महत्वाचा घटक असून सदरच्या सेवा कुळगाव बदलापूर नगरपरिषद पुरवत आहे. तरी बदलापूर शहरातील नागरीकांसाठी सदर माहिती पाहण्यासाठी नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

#### जाहीर सूचना

**शौचालयातील सांडपाणी उघडयावर अथवा नाल्यात न सोडणेबाबत**

कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील सर्व घरगुती वैयक्तिक शौचालये व सार्वजनिक शौचालयांचे सांडपाणी कोणीही उघडयावर अथवा पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यामध्ये सोडण्यात येऊ नयेत. ज्याठिकाणी मलनिस्सारण प्रक्रिया केंद्राला जोडण्याऱ्या मलनिस्सारण वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहे तेथील सर्व शौचालये मलनिस्सारण वाहिनीस जोडलेली असणे बंधनकारक आहे. तसेच ज्या ठिकाणी मलनिस्सारण वाहिन्या नाहीत त्याठिकाणी सेप्टिक टँक असणे आवश्यक आहे.

सेप्टिक टँक भरल्यानंतर नगरपालिकेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या वाहनाव्यतिरिक्त सेप्टिक टँकमधून कोणत्याही प्रकारे सेप्टिक (शौचालयाचे सांडपाणी काढू नये व सेप्टिक टँक मधील सेप्टेंज कोणत्याही परिस्थितीमध्ये खुल्या जागेत, मैदानात अथवा नदी-नाले अशा जलाशयांमध्ये सोडू अथवा डंम्पिंग करू नये.

या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे चालू आहे. त्यास अनुसरून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्थांकडून दंडनीय रक्कम वसूल करण्यात येईल.

| अ.क्र. | कृती/बाब | दंड (रूपये) |
|---|---|---|
| १. | सेप्टिक टँक मधील सेप्टेंज (शौचालयाचे सांडपाणी) निषिध्द असणाऱ्या पध्दतीने काढणे आणि/अथवा खूल्या जागेत, मैदानात अथवा नदी-नाले अशा जलाशयांमध्ये सोडणे. | रू. २,०००/- |

**सही/-**
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

#### जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या स्वच्छता नियमानुसार उघडयावर शौच करणे तसेच उघडयावर लघवी / लघुशंका करणे दंडनीय अपराध आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये खुल्या जागेत, मैदानात अथवा नदी-नाले अशा जलाशयांमध्ये उघडयावर शौच तसेच उघड्यावर लघवी / लघुशंका करू नये. या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे चालू आहे. त्यास अनुसरून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्थांकडून दंडनीय रक्कम वसूल करण्यात येईल.

| अ.क्र. | कृती/बाब | दंड (रूपये) |
|---|---|---|
| १ | उघडयावर शौच करणे | ५००/- |
| २ | उघडयावर लघवी / लघुशंका करणे | २००/- |

तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घेवून स्वच्छता सर्वेक्षण नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करावे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

## निवडक



### युईएस कॉलेजमध्ये मतदानाबाबत जागृती

**उरण :** युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या एनएसएस आणि डीएलएलई व मतदान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती अभियान कार्यक्रमाचे गुरुवारी (दि.२४) आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता यांनी मान्यवरांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना नवीन मतदार ओळखपत्राची नोंदणी ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने कशी करायची याची प्रक्रिया, तसेच मतदानाच्या अधिकाराविषयी जागरूक होण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी निवडणूक जनजागृतीची शपथ घेतली. कार्यक्रमाला सिनिअर कॉलेजच्या विभागप्रमुख, शिक्षक आणि ५८ विद्यार्थी उपस्थित होते.

### स्वीप कार्यक्रमांतर्गत स्वाक्षरी मोहीम

**नवी मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतदार



जनजागृती स्वीप कार्यक्रमांतर्गत नमुंमपा मुख्यालयात लावण्यात आलेल्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीत मी मतदानाचा हक्क बजावणार आहे, या स्वाक्षरी फलकावर नवी मुंबई मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वाक्षरी केली. प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने आपला मतदानाचा अधिकार कर्तव्यभावनेने बजावावा, असे आवाहन केले.

### नमुंमपा माध्यमिक शाळा पूर्ववत

**नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने नमुंमपा आयुक्तांसोबत शिक्षकांच्या विविध समस्यांबाबत बैठक आयोजित केली होती. बैठकीत आयुक्तांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना नवी मुंबईच्या निवेदनानुसार अनुकंपावरील नियुक्ती व माध्यमिक शाळांच्या वेळा पूर्ववत सकाळ सत्रात करणे या मागण्यांसह इतर ही मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश उपायुक्त शिक्षण यांना दिले होते. त्यातील पहिल्या दोन मागण्या पूर्ण झाल्या असून इतर मागण्या ही पूर्ण होतील, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालय पुनर्रचनेचा प्रस्ताव

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि विविध प्रकल्प, आयटी कंपन्या यामुळे नवी मुंबई, पनवेल, उरण परिरसराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामानाने उपलब्ध पोलीस ठाण्यांवर प्रचंड ताण पडू लागला आहे. त्यामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने परिमंडळ-३चा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. या प्रस्तावामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात १ पोलीस उपआयुक्त, २ सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच ४ नवीन पोलीस ठाण्यांची भर पडणार आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये दिघा ते बेलापूर असा नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्राचा तसेच पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील पनवेल-खारघर, तळोजा तसेच उरणपर्यंतच्या परिसराचा समावेश आहे. मुंबई-ठाणे-पुणे यांच्या मध्यवर्ती असलेल्या नवी मुंबई शहराच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस भर पडू लागली आहे. त्यातच या




ठिकाणी प्रस्तावित असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो रेल्वे, सागरी सेतू या प्रकल्पांमुळे नागरीकरणात भर पडत आहे, पण, वाढत्या नागरीकरणाच्या तुलनेत पोलीस बळ अपुरे पडू लागल्याने ताण वाढू लागला आहे. त्यासाठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची भौगोलिक परिस्थिती, पोलीस स्टेशनमध्ये दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या, निर्माण होणारे

### नवीन परिमंडळ ३ आणि ४ नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याचे प्रस्तावित

कायदा-सुव्यस्थेचे प्रश्न, परिसरातील लोकसंख्या, औद्योगिक क्षेत्र आदी बाबींचा विचार करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये नव्याने परिमंडळ-३ निर्माण करून त्याअंतर्गत नव्याने २ विभाग तयार करण्याचा तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव गृहविभागाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे.

परिमंडळ-१ मधील रबाळे पोलीस ठाण्याचे विभाजन करून पुनर्रचित घणसोली पोलीस स्टेशन तसेच ऐरोली विभागासाठी स्वतंत्र ऐरोली पोलीस स्टेशनचा प्रस्ताव पोलीस आयुक्तालयाने तयार केलेला आहे. त्याचप्रमाणे परिमंडळ-२मधील पनवेल शहर

> *नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाची भौगोलिक परिस्थिती, पोलीस स्टेशनमध्ये दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या, निर्माण होणारे कायदा-सुव्यस्थेचे प्रश्न, परिसरातील लोकसंख्या, औद्योगिक क्षेत्र आदी बाबींचा तसेच पुढील २० वर्षांचा विचार करून परिमंडळ- ३चा आणि नव्याने चार पोलीस स्टेशन सुरू करण्यासंदर्भातील प्रस्ताव गृह विभागाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. शासनाकडून या प्रस्तावाला लवकरच मंजुरी मिळण्याची आशा आहे.*
>
> ***-संजयकुमार पाटील**, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), नवी मुंबई*

पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या करंजाडे नोडसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशनचा प्रस्तावही तयार केला आहे. त्याशिवाय प्रस्तावित असलेल्या परिमंडळ-३मधील उरण आणि मोरा पोलीस ठाण्यांचे एकत्रिकरण करून पुनर्रचित उरण-मोरा पोलीस स्टेशनचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

नवी मुंबई विमानतळाचे काम वेगाने सुरु असून लवकरच ते पूर्णत्वास येईल. विमानतळाच्या सभोवताली नागरीकरण विकसित झालेले आहे. विमानतळ आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसराची कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशनची गरज असल्याने पोलीस आयुक्तालयाने विमानतळ पोलीस स्टेशनदेखील प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे उरणमधील स्वतंत्र द्रोणागिरी पोलीस स्टेशन प्रस्तावित करण्यात आले आहे.

शासनाकडून या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशनची संख्या २४वर जाणार आहे. या प्रस्तावाला शासनाकडून लवकरात लवकर मंजुरी मिळावी यासाठी पोलीस आयुक्तांकडून प्रयत्न सुरू आहेत.

## नेरूळमध्ये वाईन शॉपला स्थानिकांचा विरोध



**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील सेक्टर ४च्या रहिवाशांनी शेजारीच होत असलेल्या वाईन शॉपचा कडाडून विरोध केला आहे. या संदर्भात एक वर्षांपासून आंदोलनात सुरू असून प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

साई पॅराडाईज इमारतीच्या प्रमुख प्रवेशद्वाराच्या शेजारीच वाईन शॉप सुरू होणार असून समोरच लहान विद्यार्थ्यांचा स्कूल बस थांबा आहे. त्यामुळे या ठिकाणी विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होईल आणि त्याचबरोबर वाईन शॉप आल्यानंतर त्याच्या शेजारी छोटे-मोठे स्टॉल उभे राहतील. बरेचसे नागरिक वाईन शॉपसमोरच पाण्याच्या बॉटलमध्ये मद्य प्राशन करीत असतात. त्यामुळे त्याचा त्रास स्थानिकांना होईल. साई पॅराडाईज इमारतीमध्ये बरेचसे तरुण मुले आणि मुली राहतात. गेटसमोरच वाईन शॉप झाल्यास मुली या ठिकाणी सुरक्षित नसतील, अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

## पतीच्या वागणुकीला वैतागून महिला पोलिसाची आत्महत्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या एका महिला पोलिसाने पतीच्या वेळोवेळीच्या वागणूक आणि टोमण्यांना वैतागून आत्महत्येचा मार्ग निवडला. मंगळवारी दुपारी ही घटना मॅरेथॉन नेक्सॉन सोसायटीमधील झेनिथ या इमारतीमध्ये घडली.

मृत महिला पोलिसाचे नाव स्नेहा गोडसे असे आहे. २६ वर्षीय स्नेहा या पती २८ वर्षीय आकाशसोबत मॅरेथॉन सोसायटीत राहत होत्या. आकश हा आयटी कंपनीत कामाला होता. तेथील एका महिलेसोबत त्याचे अनैतिक संबंध असल्याचे स्नेहाला समजल्यावर स्नेहा आकाशला त्या महिलेसोबत बोलू नको, असे सांगत होती, मात्र आकाशला स्नेहा ही अनेक दिवसांपासून अडचण वाटू लागली होती. स्नेहा यांच्या बहिणीने दिलेल्या तक्रारीनुसार स्नेहाला आकाश हा वारंवार टोमणे मारत होता.

आकाश हा त्या महिलेसोबत बोलणारच, तू मला नको आहेस, तू मेलीस तर उलट बरे होईल. ती महिला सुशिक्षित आणि मोठ्या पगाराची नोकरी असल्याने स्नेहाची गरज नसल्याचे वारंवार सांगत असल्याने स्नेहा व आकाश यांच्यात भांडणे वाढली होती. पोलिसांकडे अनेकदा तक्रार करूनही आकाशवर त्याचा काही परिणाम झाला नाही. अखेर मंगळवारी दुपारी स्नेहा यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. पोलिसांनी आकाशविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# जिवंत काका मृत झाल्याचे भासवून जमीन हडपली

### सहा जणांवर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

वडिलोपार्जित जागेमधील हिस्सा काका आणि त्यांच्या मुलींना मिळू नये यासाठी जिवंत काकाला कागदोपत्री मृत झाल्याचे दाखवून पनवेलच्या रोहीदासवाडा येथील कोट्यवधींची जमीन स्वत:च्या नावावर करून घेणाऱ्या पुतण्यातने पूर्वीचा गुन्हा लपविण्यासाठी पुन्हा बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे पनवेल शहर पोलिसांनी या पुतण्यासह सहा जणांविरोधात फसवणुकीसह बनावटगिरी केल्याप्रकरणी आणखी एक गुन्हा दाखल केला आहे तसेच पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी राजेंद्र हिरामण म्हात्रे उर्फ उरणकर याने २०११मध्ये त्याचे काका नामदेव मारुती म्हात्रे जिवंत असताना ते मृत असल्याची बनावट कागदपत्रे तयार करून सदरची कागदपत्रे पनवेल येथील सह. दुय्यम निबंधक कार्यालयात सादर केली होती, तसेच वडिलोपार्जित जमिनीचे वारस तो स्वत: आणि आत्या सुभद्रा तळकर असे दोघेच असल्याबाबची नोंदणी करून घेतली होती. विशेष म्हणजे त्यासाठी राजेंद्र म्हात्रे याने २२ फेब्रुवारी २०११ रोजी पनवेल कोर्टातून मिळवलेला नामदेव मारुती म्हात्रे उर्फ उरणकर यांचा वारसदाखलादेखील दुय्यम निबंधक कार्यालयात सादर केला होता.

दरम्यान, नामदेव मारुती म्हात्रे उर्फ उरणकर आणि त्यांच्या वारस असलेल्या पाच मुलींनी वर्षभरापूर्वी वडिलोपार्जित जमिनीची सामाईक वाटणी करून घेण्यासाठी चुलत भाऊ राजेंद्र हिरामण म्हात्रे उर्फ उरणकर याच्यासोबत चर्चा केली होती, मात्र त्या वेळी राजेंद्र म्हात्रे याने सदर मिळकतीत काका नामदेव म्हात्रे आणि त्यांच्या मुलींचा कोणताही हिस्सा अथवा अधिकार नसल्याचे सांगून त्यांना पिटाळून लावले होते. त्यामुळे नामदेव म्हात्रे आणि त्यांच्या मुलींना संशय आल्यानंतर त्यांनी आपल्या वडिलोपार्जित जमिनीची माहिती घेतली. त्यानंतर राजेंद्र म्हात्रे याने काका नामदेव म्हात्रे मृत झाल्याबाबतची तसेच त्यांचे वारस आपणच असल्याची बनावट कागदपत्रे तयार करुन वडीलोपार्जित जमीन स्वत:च्या नावावर करुन घेतल्याचे आढळून आले होते. त्यानंतर नामदेव म्हात्रे यांच्या वारस असलेल्या पाच मुलींनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी राजेंद्र म्हात्रेसह तिघांविरोधात फसवणुकीसह बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली होती.

दरम्यान, आपली बनावटगिरी चुलत बहिणींच्या लक्षात आल्यानंतर राजेंद्र हिरामण म्हात्रे याने पूर्वीचा गुन्हा लपविण्यासाठी १३ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांच्या वडीलोपार्जित जमिनीबाबत चूक दुरूस्ती लेखदस्त तयार करून त्याची नोंदणी करून घेतली आहे. त्यात त्याने काका नामदेव मारुती म्हात्रे उर्फ उरणकर ऐवजी आजोबा मारुती हिरु म्हात्रे उर्फ उरणकर मृत असल्याची नोंद करुन घेतली आहे, तसेच त्यांनी अप्पर तहसीलदार आणि शेतजमीन न्यायालयाकडून २२ फेब्रुवारी २०११ रोजी वारस दाखला काढल्याचे दाखवले आहे. विशेष म्हणजे अप्पर तहसीलदार आणि शेतजमीन न्यायालयाकडून वारस दाखला दिला जात नसताना, राजेंद्र म्हात्रे याने खोट्या माहितीद्वारे चूक दुरूस्ती लेखदस्त नोंदणी करून शासनाची फसवणूक केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे पनवेल शहर पोलिसांनी राजेंद्र म्हात्रे आणि त्याची आत्या चंद्रा उर्फ संजीवनी मुकणे तसेच त्यांना या कामात मदत करणारे इतर चौघे अशा एकूण सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



## गोवठणे येथील रंगकर्मींचा गौरव

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

गोवठणे येथील अष्टगंध कलामंचाचे रंगकर्मी कृष्णकांत म्हात्रे व अशोक म्हात्रे या गुणी कलाकारांचा दिवाळी सणानिमित्ताने त्यांच्या नाट्यगुणांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने मंगळवारी गोवठणे येथील कलाकार कृष्णकांत म्हात्रे यांच्या निवासस्थानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी नाटककार धनेश्वर म्हात्रे, अष्टगंध कलामंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे व कलाकार जयकिसन मोकल यांच्या हस्ते सत्कारमूर्ती कृष्णकांत म्हात्रे व अशोक म्हात्रे यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या सन्मान सोहळ्याला नाटककार हसूराम पाटील, पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे, सत्कारमूर्ती कृष्णकांत म्हात्रे, कांचन म्हात्रे, सिमरन म्हात्रे, साई म्हात्रे उपस्थित होते.

## नवी मुंबईत विविध उपक्रमांतून मतदान जनजागृती



**नवी मुंबई : बातमीदार**

विधानसभा निवडणुकीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे विविध ठिकाणी मतदान जनजागृती करण्यात येत आहे.

यामध्ये नेरूळ विभागातील सेक्टर २५ जुईनगर येथील चिंचोली उद्यानात ज्येष्ठ नागरिक तसेच मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहचविण्यात आला. त्यातही विशेषत्वाने युवक व नवमतदारांपर्यंत पोहचून त्यांना मतदानाचे लोकशाहीतील महत्त्व विशद करीत मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

अशाच प्रकारे नेरूळ सेक्टर ८ येथील एल मार्केट परिसरात व्यावसायिक व ग्राहक यांच्यामध्येही मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. रामलीला मैदानात श्री अकॅडमीमधील प्रशिक्षणार्थी युवक-युवतींमध्ये लोकशाहीच्या सबलीकरणासाठी मतदानाचे महत्त्व याविषयी जनजागृती करण्यात आली व त्यांनी मतदानाचा अधिकार कर्तव्यभावनेने बजावण्याविषयी सूचित करण्यात आले. सेक्टर १ शिरवणे येथील महिला मंडळात जाऊनही मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले. सर्वच ठिकाणी मतदानाची प्रतिज्ञा घेण्यात आली व प्रतिज्ञेचे पालन करण्याविषयी सांगण्यात आले.

नमुंमपा शिक्षण विभागाच्या वतीने सेक्टर ९, वाशी येथील फादर ग्रेल स्कूलने मतदान जागृती या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. त्याचप्रमाणे नमुंमपा माध्यमिक शाळा क्र. १०२ नेरूळ येथेही चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नमुंमपा शाळा क्र. ११२ करावे यांनीही रांगोळी, पथनाट्य, वक्तृत्व आणि रॅली अशा उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमार्फत मतदानाचा संदेश प्रसारित केला. नमुंमपा सीबीएससी शाळा क्र. ९४ कोपरखैरणे येथे पोस्टर मेकींग स्पर्धा तसेच नमुंमपा शाळा क्र. ८१ (उर्दू) खैरणे येथे चित्रकला स्पर्धा उत्साहात झाली. नमुंमपा शाळा क्र. १०८, दिघा यांनीही जनजागृतीपर रॅली काढून परिसरात मतदानाविषयी जनजागृती केली.

कोपरखैरणे विभाग कार्यालयात अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित नागरिकांसह मतदानाची सामुहिक शपथ घेतली तसेच बेलापूर विभागातील सेक्टर ११ मार्केटमध्ये उपस्थित व्यावसायिक व ग्राहक तसेच वाहन दुरूस्ती दुकानांतील कामगार व वाहतुक पोलीस यांच्यासह मतदानाची सामुहिक शपथ ग्रहण करण्यात आली.

### कुसुमाग्रज प्रतिष्ठानची ग्रंथ तुमच्या दारी योजना

**पनवेल : वार्ताहर**

कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांची ग्रंथ तुमच्या दारी ही योजना दोस्ती ग्रुप फाऊंडेशन पनवेल यांनी नुकतीच सुरू केली आहे. या योजनेमध्ये वाचकांना विनामुल्य मराठी साहित्य वाचनासाठी उपलब्ध होणार आहे. या संधीचा जास्तीत जास्त वाचकांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दोस्ती ग्रुप फाउंडेशनचे संस्थापक पंकज भगरे, अध्यक्ष अक्षय अहिरे, सचिव विनायक तांदळे, कार्याध्यक्ष अनिकेत शिंदे, सल्लागार विनाय भावे, सुयोग पाटी, अनिरुद्ध कारंगुटकर, सौरभ पाटील, शैलेश चौधरी, अजय अहिरे, सुरज गरड यांनी जनता मार्केट शॉप नं.१६, सेक्टर १३ नवीन पनवेल येथे सुरू केले आहेत.

अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी (७८९७८९६७६२) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## फटाकेमुक्त दिवाळी, आनंदी आणि सुरक्षित दिवाळी अभियान

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नवी मुंबईतील घणसोली शाखेतर्फे, फटाकेमुक्त दिवाळी अभियानांतर्गत संवादसत्र शुक्रवारी (दि.२५) कोपरखैरणे सेक्टर ४मधील विद्यादीप विद्यालयात पार पडले.

सण उत्सव साजरे करताना पर्यावरणाचे भान ठेऊया. दिवाळीत फटाके फोडल्यामुळे होणारे दुष्परिणाम घातक आहेत. फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण, माती प्रदूषण व पाणी प्रदूषण होते. यामुळे सण साजरे करून आनंद मिळवण्याच्या आपल्या मूळ उद्देशाला बाधा येते. म्हणून दिवाळीत आनंद मिळवण्यासाठी फटाके न फोडताही इतर प्रकारे आनंद मिळवता येतो. जसे की आकर्षक आकाशकंदील स्वत:च्या हाताने बनवून शोभा वाढवता येते. सुंदर रांगोळी



काढून आपल्या घराची शोभा वाढवता येते. इतकेच नाही तर रांगोळीतून चांगला संदेशही देता येईल. सुंदर व आकर्षक शुभेच्छा पत्र बनवून आपल्या मित्रमैत्रिणींना देऊन मैत्री जपता येते. दिवाळीत प्रकाशित होणारे दिवाळी अंक विकत घेऊन आपला वाचनाचा छंद जोपासता येतो. नवीन कपडे विकत घेऊन दिवाळी साजरी करता येते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे फराळ बनवून त्यांचा आस्वाद घेऊ शकतो, आपल्या मित्रमैत्रिणींना फराळ देऊन स्नेह वाढवता येतो.

फक्त आपण सजग व्हायला पाहिजे. फटाक्यांमुळे होणारे अपघात आपण फटाके न फोडता टाळू शकतो. आपण आपल्या कृतीतून जबाबदार नागरिकांची भूमिका पार पाडली पाहिजे. आपला आनंद व्यक्त करताना इतरांचाही विचार केला पाहिजे, असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. संवादसत्रात गजानंद जाधव यांनी मार्गदर्शन केले, तसेच महा. अंनिस कार्यकर्ते अशोक निकम उपस्थित होते.


# आम्हाला कोणी थोपवू शकणार नाही

## आमदार भरत गोगावले यांचे प्रतिपादन; निजामपुरात सत्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

आमची नीती चांगली आहे. त्यामुळे आम्हाला कोणी थोपवू शकणार नाही, असे प्रतिपादन महाड, पोलादपूर, माणगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले यांनी निजामपूर येथील कार्यक्रमात बोलताना केले.



नायक मराठा न्याती मंडळ निजामपूर विभागातर्फे निजामपूर येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते दत्तूशेठ पवार, शिवसेनेचे संपर्क प्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, निजामपूर सरपंच राजाभाऊ रणपिसे, कडापे ग्रामपंचायत माजी सरपंच मारुती मोकाशी, सुधीर पवार, मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण महाळुंगे, अनंता महाडिक, बाळाराम दबडे, तरुण उद्योजक मंगेश पोळेकर, देविका पाबेकर, रामजी कदम, अविनाश नलावडे, नितीन पवार, मारुती पवार, राजेश कदम, चंद्रकांत जोरकर यांच्यासह मुंबईकर मंडळी, महायुतीचे विभागातील पदाधीकारी व कार्यकर्ते, नायक मराठा न्याती मंडळाचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना सत्कारमूर्ती आमदार गोगावले म्हणाले की, आजचा कार्यक्रम पाहून मानला समाधान वाटत आहे. मी एक पक्षाचा नेता, आमदार व पदाधिकारी आहे, परंतु पहिले एका समाजाचा घटक आहे. नायक मराठा न्याती मंडळाची देखणी वास्तू आपण निजामपुरात उभी करू. आपल्या सर्वाच्या आशीर्वादाने मी मराठा समाजाचा आमदार असून चौथ्यांदा आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने लोकप्रतिनिधी होऊन मंत्री होणार आहे.

आम्ही चांगली कामे करतो म्हणून लोक आम्हाला स्वीकारत असतात. आपण मला तीन वेळा निवडून दिलेत याची जाणीव मला आहे. महाड मतदारसंघातील अगदी इकडून रवाळजेपासून ते खेडजवळच्या पळचिलपर्यंत असे एकही गाव, वाडी, वस्ती नाही जेथे आम्ही पोहचलो नाही. आमच्या सरकारने विविध लोकाभिमुख योजना आणल्या. आम्ही विकासकामांबरोबरच लोकांच्या प्रसंगाला धावून जाऊन मदत करीत असतो. तुम्ही पाच वर्षातून फक्त एकदा आम्हाला आशीर्वाद द्या, त्यानंतर पाच वर्षे आम्ही तुमचे सेवेकरी आहोत, असे आमदार गोगावले यांनी सांगितले.

आम्ही लोकसभा निवडणुकीत प्रामाणिकपणे खासदार सुनील तटकरे यांचे काम केले. आता आदिती तटकरे यांना विजयी करणार आहोत. जे बाबू,साबू महायुतीतून बाहेर पडले त्याचा आम्हाला काही फरक पडणार नाही. आम्ही काम करणारी मंडळी असून जो कोणी पाच वर्षात या विभागात फिरला नाही त्यांना तुम्ही मतदान करणार की आम्हाला करणार, असा सवाल आमदार गोगावले यांनी करून मला आमदार म्हणून निवडून पुन्हा संधी द्यावी, असे आवाहन केले.

# घरपट्टी वसुलीसाठी खोपोली पालिकेकडून सोसायट्यांमध्ये कॅम्प

**खोपोली : प्रतिनिधी**



नगर परिषदेचे प्रमुख उत्पादन स्रोत म्हणजे घरपट्टी व पाणीपट्टी होय. या वसुलीबाबत शासनाकडून वारंवार आढावा घेतला जातो. नागरी सुविधा पुरविणेकामी मालमत्ताधारकाकडून घरपट्टी वसूल होण्यासाठी खोपोली नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनी कंबर कसली असून कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायट्यांमध्ये कॅम्प आयोजित करून नियोजन केले जात आहे.

करवसुलीसाठी नागरिकांमध्ये जनजागृती होण्याकामी रिक्षाद्वारे जाहीर आवाहन केले जात आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार बिल जनरेट झाल्यापासून तीन महिन्याच्या आत घरपट्टी न भरल्यास प्रति महिना दोन टक्के इतका दंड आकारण्यात येत आहे. मालमत्ताधारकांच्या सोयीसाठी नागरिकांना घरपट्टी भरणे सोयीस्कर होण्याकामी नगर परिषदेतील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून गृह सोसायटीमध्ये कॅम्पचे आयोजन केले जात आहे. यानुसार मालमत्ताधारक क्युआर कोड/स्कॅनरचा वापर करून रक्कम नगर परिषद फंडात भरत आहेत.

मालमत्ता करवसुलीबाबत नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या आदेशाने व कर अधिकारी युवराज विरणक यांच्या मार्गदर्शनाने पदनिर्देशित अधिकारी व सहाय्यक हे करवसुलीकामी मेहनत घेत आहेत. मालमत्ताधारकांनी कराचा भरणा लवकरात लवकर करून नगर परिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. पाटील यांनी नागरिकांना केले आहे.

# वळके येथे महिलेला चाकूचा धाक दाखवून लुटले

## आरोपी अटकेत

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वळके येथे रात्रीच्या सुमारास घरात शिरून महिलेस चाकुचा धाक दाखवून लुटल्याची घटना घडली. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

मुरुड तालुक्यातील वळके येथील ४५ वर्षीय पुष्पा सुभाष पाटील यांच्या राहत्या घरात रात्री साडेअकराच्या सुमारास गावातीलच प्रमोद सखाराम काटकर (वय ३४) याने वरच्या मजल्यावर चढून जिन्यावाटे आत प्रवेश केला व घरात एकट्याच झोपलेल्या पुष्पा पाटील यांना चाकुचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. या वेळी त्यांनी कपाटात ठेवलेले ७३०० रुपये रक्कम घेऊन प्रमोद काटकर याने जबरी चोरी केली. तशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आली असता गुन्हा दाखल झाला.

या प्रकरणी रेवदंडा पोलिसांनी आरोपीस अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

# कर्जतमध्ये अपक्ष उमेदवार सुधाकर घारेंचा अर्ज दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा दिलेले नेते सुधाकर घारे यांनी अपक्ष म्हणून आपला अर्ज दाखल केला.




सुधाकर घारे यांना सकाळी सांगवी येथे निवासस्थानी मातोश्री आणि पत्नी यांच्याकडून औक्षण करून रॅलीला सुरुवात झाली. घारे व त्यांच्या समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला होता. कर्जतमध्ये रॅली काढून घारे यांनी अर्ज भरण्यासाठी पोहचले व निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्याकडे अर्ज सादर केला.

या वेळी घारे यांच्यासोबत दत्तात्रय मसुरकर, भरत भगत, अशोक भोपतराव, भगवान भाईर हे चार जण होते. अर्ज दाखल केल्यानंतर घारे यांनी तेथील पोलीस मैदानात कार्यकर्त्यांना संबोधित केले. सुरेखा खेडकर, भरत भगत यांनीही मनोगते व्यक्त केली.

कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी डी.डी. टेळे, खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक सुरेंद्र गरड, शिवाजी ढवळे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# पोलीस हवालदार सुमित जाधव पुरस्काराने सन्मानित

**माणगाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कोलाड येथील वाहतूक पोलीस हवालदार सुमित जाधव यांना उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेना प्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते कर्तव्यदक्ष वाहतूक पोलीस पुरस्काराने तालुका पत्रकार संघाच्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

कुणबी भवन हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमास व्यासपीठावर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, माणगावच्या नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर-काळे, पंचायत समितीच्या माजी सभापती संगीता बक्कम, पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, उद्योजक विजयशेठ मेथा, सुभाष दळवी, नगरसेवक राजेश मेहता, दिनेश रातवडकर, माजी नगरसेवक नितीन बामगुडे, आदर्श शिक्षिका विनया जाधव आदी उपस्थित होते.

# भौतिक प्रगतीच्या वाटेवर जात असताना पर्यावरणाकडे अक्षम्य दुर्लक्ष -वैभव सरनाईक

**महाड : प्रतिनिधी**

प्रदूषणामध्ये वाढ होत असताना त्याचे विपरीत परिणाम मानवी जीवनावर होत आहेत. सर्वजण भौतिक प्रगती साध्य करण्यासाठी प्रयत्न करत असताना पर्यावरणाकडे मात्र आपले अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे, असे मत श्री क्षेत्र गणपतीपुळे येथील प्राचीन कोकण संस्थेचे संस्थापक वैभव सरदेसाई यांनी परंपरागत पर्यावरणाचे महत्व या विषयावर महाडकर नागरिकांशी संवाद साधत असताना केले.



महाड येथील कै. काकासाहेब चितळे स्मृती केंद्रामध्ये एक वृक्ष आईसाठी म्हणजेच भारत मातेसाठी हा पर्यावरण आणि सामाजिकतेचे भान जोपासणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन चितळे स्मृती केंद्र व गौतमी फाऊंडेशन या संस्थांतर्फे करण्यात आला होता. यातील पहिला कार्यक्रम महाड येथे झाला.

कार्यक्रमाला कै. काकासाहेब चितळे स्मृती केंद्राचे अध्यक्ष धनंजय परांजपे, महाडमधील ज्येष्ठ डॉ. अनिल धारप, भारत मेहता, राकेश मेहता, ॲड. विद्या भाटे, मिनाक्षी सौदलेकर, मंजू पित्रे, मेघा मेहता, डॉ राहुल वारंगे, आस्था संस्थेच्या संचालिका जयश्री परांजपे, बांधकाम व्यावसायिक मनोज पयेलकर, माधव डाकवे, विकास सौदलेकर आदी मान्यवरांसह शालेय विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन सांगताना डॉ. अजय जोगळेकर यांनी, निसर्ग संवर्धन आणि संगोपन करताना आपल्या विज्ञाननिष्ठ परंपरेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. हजारो वर्षांच्या या शाश्वत ज्ञानाचा आधार घेऊन सामाजिक चळवळींना योग्य दिशा दिल्यास आपण वृक्षांचे संवर्धन करू शकतो, असे सांगितले.

पर्यावरणाचे अभ्यासक वैभव सरदेसाई म्हणाले, प्रत्येक ऋतूमध्ये निसर्गातील वातावरण वेगवेगळे असते आणि त्या वातावरणाला पूरक असा एक वृक्ष असतो. हाच वृक्ष मानवाला सजीवसृष्टीतून भरभरुन देतात. निसर्गाचे परंपरागत ज्ञान असलेल्या आपल्या ऋषी-मुनींनी देशातील भूमीमध्ये असलेल्या वृक्षांतून २७ वृक्ष निवडले आहेत. अशा वृक्षांतून अनेक विकार पूर्णपणे बरे होऊ शकतील आणि त्याचबरोबर पृथ्वी प्रदूषणमुक्त राहू शकेल.

सरदेसाई पुढे म्हणाले, कोकणात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी येथील वातावरण, सभोवतालचा परिसर; त्याचबरोबर कोकणच्या प्रकृतीचा अभ्यास केल्यास पर्यावरणपूरक व्यवसाय-उद्योग उभारण्याची संधी कोकणामध्ये असल्याचे दिसून येईल, मात्र आपण कोकणवासीच या महत्त्वपूर्ण विषयाकडे दुर्लक्ष करीत आहोत.

पर्यावरणाचे रक्षण करणारा व सामाजिकतेचे भान राखणारा हा उपक्रम शालेय स्तरावर राबविण्याचा आपला प्रयत्न असून नागरिकांना अशा प्रकारच्या उपक्रमांमध्ये अधिकाधिक संख्येन सहभाग घ्यावा, असे आवाहन गौतमी फांऊडेशनचे डॉ. अजय जोगळेकर आणि डॉ. प्रज्ञा जोगळेकर यांनी केले. सूत्रसंचालन व आभार सौंदरेकर यांनी व्यक्त केले.

# नांदगाव हद्दीत बीएसएनएलचे नेटवर्क गायब

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीत बीएसएनएल कंपनीचे नेटवर्क नसल्याने असंख्य नागरिक विशेषत: बँक ग्राहकांना याचा मोठा फटका सहन करावा लागत आहे.

लोकसंख्येने मोठ्या असलेल्या नांदगाव ग्रामपंचायतीच्या आजूबाजूस ११ गावे वसलेली आहेत. ऑनलाइन क्लासेस व परीक्षा, अभ्यासिका तसेच दिवाळी सण तोंडावर आहे, मात्र बीएसएनएलचे नेटवर्क नसल्यामुळे अडथळा येत आहे. बँकेचे आर्थिक व्यवहारसुद्धा बंद पडले आहेत. तक्रार दाखल केल्यावर थोडे दिवस नेटवर्क राहते व पुन्हा गायब होते.

बीएसएनएलच्या सुविधा मिळवण्यासाठी ग्राहक रोख रकमेचा भरणा करीत असतात. बिल भरण्यास विलंब झाला तर त्यावर व्याज आकारला जातो, मात्र येथे पैसे भरूनसुद्धा नेटवर्क मिळत नाही. याकडे अधिकारीवर्ग लक्ष देत नसल्याने लोक वैतागले आहेत.

# आचारसंहितेचे उल्लंघन होतेय? मग सी व्हिजिल ॲपवर तक्रार करा

निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.त्यासाठी १५ ऑक्टोबरपासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल सिटीझन ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.




आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते, पण काहीवेळा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाईल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी व्हिजिल ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

सी व्हिजिल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडीओ प्रदान करणे आवश्यक आहे. ॲप वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

### वैशिष्ट्ये

सी व्हिजिल ॲप हे वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

### वापर कसा करायचा

अन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील ॲप स्टोर या पमध्ये जावून सी व्हिजिल सर्च करावे. त्यानंतर ॲप डाऊनलोड करा. त्यानंतर ॲप उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.

### अचूक कृती व देखरेख

या ॲप्लिकेशनचा वापर करून निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सी व्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

### लाईव्ह फोटो, व्हिडीओ

या ॲपच्या अचूकतेसाठी पमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हीडिओ घेतले जातात, जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.

### तातडीने होते कारवाई

या ॲपवर तक्रार दाखल होताच स्थानिक निवडणूक यंत्रणा तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कारवाई करेल.

### डाटा सुरक्षा

या ॲपवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एण्ड टू एण्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

-संध्या गरवारे

# दिवाळीनिमित्त किल्ले बांधण्यात रमले बालगोपाळ

**माणगाव : प्रतिनिधी**

दिवाळीत किल्ल्यांची मोठी परंपरा महाराष्ट्रामध्ये आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर लहानगे व युवावर्ग किल्ल्यांच्या प्रतिकृती आपल्या घरासमोर, सोसायटीच्या आवारात व सार्वजनिक ठिकाणी तयार करतात. यंदाही हे चित्र दिसून येत आहे.



रायगड जिल्ह्यात किल्ल्यांची असलेली पार्श्वभूमी यामुळे दिवाळीतील किल्ले बांधणीला आगळेवेगळे महत्व आहे. दिवाळीनिमित्त बाजारपेठेतही तयार किल्ल्यांच्या प्रतिकृती विकण्यासाठी उपलब्ध झाल्या असून विविध आकार, प्रकार यामध्ये या प्रतिकृती उपलब्ध आहेत.

प्रथम सत्र परीक्षा संपत असून दिवाळीनिमित्त बच्चेकंपनी किल्ले बांधण्यात रंगली आहे. प्रौढ, ज्येष्ठांचीही त्यांना मदत होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज प्रतिकृती, सिंहासन, मावळे, सैनिक, प्राणी यांना बाजारपेठेत चांगली मागणी असून किल्ल्यांच्या प्रतिकृतींचीही मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते आहे.

या वर्षी मोठ्या प्रमाणात दिवाळीचा उत्साह दिसून येत असून बच्चेकंपनी किल्ले बांधण्यात व्यस्त असल्याने पालकांनीही समाधान व्यक्त केले आहे.

> **दिवाळीनिमित्त दरवर्षी शाळेच्या व पालकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही किल्ले उभारतो. या वर्षी आम्ही मित्रांच्या मदतीने सुंदर अशी प्रतिकृती तयार करत आहोत. मातीचा किल्ला बांधण्यात काही वेगळाच आनंद असतो व तो आम्हाला मिळत आहे.**
> **-सोहम गजमल, विद्यार्थी**

> **दिवाळीच्या पार्श्वभूमीवर किल्ले बांधणी करून ऐतिहासिक परंपरा जतन केली जाते. यातून किल्ल्यांची माहिती मिळते व निर्मितीचा आनंद मिळतो.**
> **-श्रीकृष्ण गरधे, शिक्षक**

# टीम इंडियाची फलंदाजी ढेपाळली

## पुणे कसोटीत सँटनरचे सात बळी; न्यूझीलंडला १०३ धावांची आघाडी



**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय संघ सलग दुसर्‍या कसोटीसह मालिका गमावण्याची शक्यता निर्माण झाली. पुण्याच्या टर्निंग पिचवर भारताचा पहिला डाव १५६ धावांवर आटोपला. यानंतर न्यूझीलंडने दुसर्‍या डावात दुसर्‍या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ५ बाद १९८ धावा केल्या असून पहिल्या डावाच्या जोरावर १०३ धावांची आघाडी घेतली, ज्यामुळे किवी संघाची आघाडी ३०१ धावांपर्यंत पोहचली आहे. त्यामुळे टीम इंडियाला १२ वर्षांनंतर आपल्याच घरात कसोटी मालिका गमावण्याचा धोका निर्माण झाला आहे.

भारताकडून फलंदाजी करताना पहिल्याच दिवशी सलामीवीर रोहित शर्मा खातेही न उघडता साऊदीच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. यानंतर यशस्वी जैस्वाल आणि शुबमन गिलने भारताचा डाव पुढे नेण्याचा चांगला प्रयत्न केला, पण फिरकीसमोर दोघेही मोठी धावसंख्या उभारू शकले नाहीत. शुबमन गिल दुसर्‍या दिवशी ३० धावा करत बाद झाला आणि त्यानंतर एकापाठोपाठ एक भारताचे फलंदाज माघारी परतले. यशस्वी जैस्वालही त्यानंतर ३० धावा करत बाद झाला. विराट कोहली फुलटॉस चेंडूवर अनपेक्षितपणे बाद झाला आणि एक धाव घेत तो माघारी परतला.

ऋषभ पंत आणि सर्फराझ खानकडून एका महत्त्वपूर्ण भागीदारीची आणि चांगल्या खेळीची अपेक्षा होती, पण हे दोघेही स्वस्तात बाद झाले. पंतला ग्लेन फिलिप्सने क्लीन बोल्ड केले, तर सर्फराझ खान बेजबाबदारपणे फटका मारत झेलबाद झाला. यानंतर आलेल्या रवींद्र जडेजाने संघाचा डाव पुढे नेला. जडेजाने ४६ चेंडूत तीन चौकार आणि दोन षटकारांसह ३८ धावांची चांगली खेळी केली, पण सँटनरच्या फिरकीपुढे तोही फार मोठी धावसंख्या रचू शकला नाही.

जडेजा बाद झाल्यानंतर वॉशिंग्टन सुंदर आणि आकाशदीपने चौकार, षटकार लगावत काही प्रमाणात भारताला धावा करून दिल्या, पण फार काळ मैदानात टिकू शकले नाहीत. अशा रितीने मिचेल सँटनरने कसोटीतील उत्कृष्ट स्पेल टाकत भारतीय संघाला दणका दिला. सँटनरने १९.३ षटकांत ५३ धावा देत सात विकेट्स घेतल्या.

सध्या पहिल्या डावाच्या आधारे न्यूझीलंड संघाककडे ३०१ धावांची आघाडी आहे. अशात पुण्याच्या टर्निंग पिचवर ३५० धावांचे लक्ष्यही सामना जिंकण्यासाठी पुरेसे आहे. न्यूझीलंड संघाने दुसर्‍या डावात २५० धावा केल्या तरी भारतासमोर विजयासाठी किमान ३५० धावांचे लक्ष्य असेल. पुण्याच्या टर्निंग पिचवर ३०० ते ३५० धावांचे लक्ष्य गाठणे म्हणजे डोंगर चढण्यासारखे असेल. इथून आता टीम इंडियाचे पुनरागमन जवळपास अशक्य वाटत आहे.

## आश्चर्यकारक! ५२ धावांवर दोन विकेट्स आणि ५३ धावांवर सर्वबाद



**वाका : वृत्तसंस्था**

सध्या एकदिवसीय चषक खेळला जात आहे. त्यामध्ये वेस्टर्न ऑस्ट्रेलिया संघाने तस्मानियाविरुद्ध केवळ एका धावात आठ विकेट्स गमावल्या. ती एक धावही वाईड बॉल पडल्यामुळे आली. अशा प्रकारे ऐतिहासिक विकेट्स पडल्यामुळे वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे एकदिवसीय चषक बचावाचे स्वप्नही धोक्यात आल्याचे दिसत आहे.

वाका मैदानावर खेळल्या गेलेल्या या सामन्यात वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचा संघ २०.१मध्ये केवळ ५३ धावा करून सर्वबाद झाला. तस्मानियासाठी बो वेबस्टरने त्याच्या सहा षटकांच्या स्पेलमध्ये १७ धावांत सहा विकेट्स घेतल्या, तर वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे सहा फलंदाज शून्यावर बाद झाले. वेस्टर्न ऑस्ट्रेलियाने १६ षटकात ५२ धावात केवळ दोन विकेट्स गमावल्या होत्या, पण नंतर जे घडले ते ऐतिहासिक होते. वेस्टर्न ऑस्ट्रेलियाने २८ चेंडूत आठ विकेट्स गमावल्या. ऑस्ट्रेलिया दोन बाद ५२ धावा आणि त्यानंतर ५३ धावांवर सर्वबाद झाला. त्यामध्ये ५, ६, ७, ८, ९, १० आणि ११ क्रमांकाच्या फलंदाजांपैकी एकही फलंदाज धावा करू शकला नाही.

एकदिवसीय चषकाच्या इतिहासातील ही दुसरी सर्वात कमी धावसंख्या होती. २००३मध्ये दक्षिण ऑस्ट्रेलिया संघ होबार्टमध्ये तस्मानियाविरूद्ध ५१ धावा करून सर्वबाद झाला होता. तस्मानियाने हे लक्ष्य केवळ ८.३ षटकांत पूर्ण केले आणि सात गडी राखून विजय शानदार मिळवला होता.

सलग चौथ्यांदा विजेतेपद मिळवण्याचा वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचा प्रयत्न आता धोक्यात आला आहे. एक विजय आणि तीन पराभवांसह ऑस्ट्रेलियाला त्यांच्या उर्वरित तीन सामन्यांमध्ये व्हिक्टोरिया, दक्षिण ऑस्ट्रेलिया आणि क्वीन्सलँडचा पराभव करावा लागणार आहे.

## यशस्वी जैस्वालने गाठला नवा पल्ला

### कमी वयात कॅलेंडर वर्षात एक हजार कसोटी धावा



**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडविरुद्ध खेळल्या जात असलेल्या दुसर्‍या कसोटी सामन्यातील पहिल्या डावात यशस्वी जैस्वाल याने ३० धावांची खेळी साकारत मोठा पराक्रम केला आहे. वयाच्या २३ वर्षापूर्वी एका कॅलेंडर वर्षात एक हजार कसोटी धावा करणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला. एबी डिव्हिलियर्स आणि लिस्टर कुकचा विक्रम मोडण्यात तो थोडक्यात चुकला.

यशस्वी जैस्वालने या वर्षी म्हणजे २०२४मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये एक हजार धावा पूर्ण केल्या आहेत. त्याला एबी डिव्हिलियर्स आणि लिस्टर कूकला मागे टाकण्याची संधी होती. वयाची २३ वर्षे पूर्ण करण्यापूर्वी एका कॅलेंडर वर्षात एक हजारहून अधिक धावा करणार्‍या फलंदाजांबद्दल बोलायचे, तर त्यात जैस्वालचे नावही जोडले गेले आहे. एका वर्षात सर्वाधिक कसोटी धावा करण्याच्या बाबतीत गॅरी सोबर्सचे नाव आघाडीवर आहे. हे काम त्यांनी १९५८ साली केले आहे.

२००३मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या ग्रीन स्मिथने हा पराक्रम केला तेव्हा त्याने २३ वर्ष पूर्ण नसताना एका कॅलेंडर वर्षात ११९८ कसोटी धावा केल्या होत्या. २००५ साली द. आफ्रिकेच्याच एबी डिव्हिलियर्सने १००८ धावा केल्या होत्या, तर इंग्लंडच्या लिस्टर कुकने २००६मध्ये १०१३ धावा केल्या होत्या.

## टिम साऊदीसमोर रोहित शर्मा पुन्हा हतबल!



**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्यात न्यूझीलंडविरूद्ध खेळल्या जात असलेल्या कसोटीच्या पहिल्या डावात रोहित शर्मा शून्यावर बाद झाला. टिम साऊदीने पुन्हा त्याला आपली शिकार बनवले. यासह त्याच्या नावावर लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली.

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माला पुण्यात खेळल्या जात असलेल्या दुसर्‍या कसोटी सामन्यात नकोसा विक्रम केला आहे. न्यूझीलंडचा संपूर्ण संघ २५९ धावांत गार झाल्यानंतर रोहित जैस्वालसह भारताला चांगली सुरुवात करुन देईल असे वाटत होते, परंतु तो शून्यावर बाद झाल्याने त्याच्या नावावर लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे. त्याने याबाबतीत कपिल देव यांनाही मागे टाकले आहे. जवळपास नऊ वर्षांनी रोहित शर्मा मायदेशात कसोटी सामन्यात शून्यावर बाद झाला आहे. त्याला टिम साऊदीने क्लीन बोल्ड केले.

याआधी २०१५मध्ये दिल्लीच्या फिरोजशाह कोटला स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यातील दुसर्‍या डावात रोहित शून्यावर बाद झाला होता. त्यानंतर आता रोहित भारतात कसोटी सामन्यात शून्यावर बाद झाला आहे. तो शून्यावर बाद झाल्याने भारतीय चाहत्यांना मोठा धक्का बसला. तत्पूर्वी रविचंद्र अश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर या फिरकीपटूंनी भारतासाठी शानदार गोलंदाजी केली. त्यामुळे न्यूझीलंड संघाचा पहिला डाव पहिल्याच दिवशी पहिल्या गुंडाळण्यात यश आले.

ज्या गोलंदाजाने त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक त्रास दिला आहे, त्याच गोलंदाजाविरुद्ध रोहित शर्मा पुन्हा एकदा बाद झाला. आतापर्यंत टिम साऊदीने त्याला १४ वेळा बाद केले आहे. कागिसो रबाडानेही त्याला १४ वेळा बाद करण्यात यश मिळविले आहे.

### कपिल देवचा लाजिरवाणा विक्रम मोडला

कर्णधार म्हणून शून्यावर आऊट होण्याच्या बाबतीत रोहित शर्माने कपिल देव यांना मागे टाकले आहे. या यादीत विराट कोहली पहिल्या क्रमांकावर आहे. आतापर्यंत तो १६ वेळा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून शून्यावर आऊट झाला आहे. सौरव गांगुली १३ वेळा आणि एमएस धोनी ११ वेळा शून्यावर बाद झाला आहे. आता रोहित शर्मानेही धोनीप्रमाणे ११ वेळा शून्यावर बाद होण्याचा नकोसा विक्रम केला आहे. कपिल देव आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून १० वेळा शून्यावर आऊट झाले आहेत.

## बाळाच्या जन्माची माहिती मिळताच सामना अर्धवट सोडून गेला क्रिकेटपटू



### पुन्हा येऊन केली फलंदाजी

दुसर्‍या मुलाच्या जन्मानंतर कार्टराईटने मैदानात शानदार पुनरागमन केले आणि वाका मैदानावर आपला डाव पूर्ण केला, हॉस्पिटलमधून परतल्यानंतर सामनाधिकारी त्याला मैदानावर पुन्हा जाण्याची परवानगी देतील की नाही, अशी चिंता त्याला सतावत होती, पण चर्चा केल्यानंतर तो पुन्हा क्रीझवर परतला आणि त्याने ६५ धावांची खेळी खेळली.

**वाका : वृत्तसंस्था**

क्रिकेटमध्ये अनेकदा फलंदाजी करत असलेला खेळाडू दुखापत झाल्यामुळे रिटायर्ड हर्ट होऊन मैदानाबाहेर जाऊ शकतो, असे घडतानाही आपण अनेकदा पाहिले आहे, पण ऑस्ट्रेलियामध्ये एक वेगळीच घटना घडली आहे. ऑस्ट्रेलियाचा खेळाडू चालू सामन्यातच रिटायर्ड होत आपल्या बाळाच्या जन्मासाठी गेला.

वेस्ट ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू हिल्टन कार्टराईट सध्या चर्चेत आहे. त्याच्या मुलाच्या जन्माची बातमी ऐकून तो चालू सामन्यात रिटायर होऊन बाहेर पडला. या वेळी शेफिल्ड शील्ड स्पर्धेत वेस्ट ऑस्ट्रेलिया संघाचा सामना तस्मानियाविरुद्ध सुरू होता. दरम्यान, हिल्टनला त्याच्या दुसर्‍या मुलाच्या जन्माची माहिती मिळताच त्याने सामना अर्ध्यातच सोडला. तो नाबाद ५२ धावांवर खेळत होता. तेवढ्यात टी-ब्रेकही झाला होता. या टी ब्रेकदरम्यान त्याला त्याच्या पत्नीचा फोन आला की, ती हॉस्पिटलमध्ये दाखल होणार आहे. हे ऐकताच तो लगेच सामना सोडून हॉस्पिटलमध्ये निघाला.

३१ वर्षीय खेळाडूने स्वतः सांगितले की, माझी पत्नी तमिका गरोदर होती. त्यामुळे माझ्या दुसर्‍या मुलाच्या जन्मामुळे सामन्यावर परिणाम होऊ नये, असे मला वाटत होते. म्हणून नंतर मी लगेच येऊन पुन्हा सामना खेळलो. सामना अधिकार्‍यांनाही याबाबत माहिती दिली होती आणि त्यांनी मला खूप मदत केली. तो पुढे म्हणाला की, तस्मानिया संघालाही या गोष्टीची माहिती होती. या वेळी संघाचे प्रशिक्षक आणि कर्णधाराने मी केव्हा जाऊन परत येऊ शकतो याचे संपूर्ण नियोजनही केले होते.

कार्टराईटच्या खेळीमुळे पश्चिम ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३३२ धावा केल्या. ८३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना कार्टराईटने नंतर नाबाद ३९ धावा केल्या आणि संघाला सहा गडी राखून विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावलीय. कार्टराईटला हा दिवस मैदानावर आणि मैदानाबाहेरील या घटनेमुळे नेहमी लक्षात राहील.

## खो-खो स्पर्धेत शाहू महाराज विद्यालय प्रथम



**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई विभागीय १७ वर्ष गट मुलांच्या खो-खो स्पर्धेत नवी मुंबई महापालिका संचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय रबाळे आंबेडकरनगर या संघाने भिवंडी निजामपूर मनपा संघावर १८ विरुद्ध ०२ गुणांनी एकतर्फी विजय संपादन करत प्रथम क्रमांक पटकावला. आता हा संघ सांगली येथे होणार्‍या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

स्पर्धा पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे झाली. रबाळे संघाने उपउपांत्य सामन्यात वसई विरार मनपावर १५ विरुद्ध ०२ अशी मात केली व उपांत्या सामन्यात रायगड जिल्हा संघावर १५ विरुद्ध ०२ अशी मात करत अंतिम फेरीत धडक दिली आणि अंतिम सामन्यात भिवंडी निजामपूर मनपावर एक हाती विजय मिळवून आपला दबदबा कायम ठेवला.

या संपूर्ण स्पर्धेत अष्टपैलू खेळाडू भारत पुरस्कार प्राप्त आशिष गौतम, ओंकार सावंत व करण गुप्ता यांनी उत्तम संरक्षण करत तसेच ऋग्वेद शिंदे, गणेश गायकवाड, अशीष रत्नाकर यांनी उत्तम आक्रमण करून संघाला विजेता करण्यामध्ये मोलाचा वाटा उचलला. या संघात बसुराज कंपापुर, वीर पवार, यश मेंगडे, रवी मदने, ऋतिक पवार, पार्थ जगताप यांचाही समावेश होता. सर्व खेळाडूंना प्रशिक्षक प्रताप शेलार, स्वप्नील पाटील, अभिषेक परब, लक्ष्मण गवस, क्रीडा शिक्षक अमोलकुमार वाघमारे, दिनेश भोये यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

या यशाबद्दल माजी महापौर सुधाकर सोनवणे, शिक्षण अधिकारी अरुणा यादव, क्रीडा अधिकारी रेवाप्पा गुरव, मुख्याध्यापक अमोल खरसंबळे, रंजना वनशा यांनी विजेत्या संघातील खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## विराटला फुलटॉस बॉलवर आडवा शॉट मारणे पडले महागात!




**पुणे : प्रतिनिधी**

भारत विरुद्ध न्यूझीलंड संघातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना पुण्यातील एमसीए क्रिकेट स्टेडियमवर खेळला जात आहे. या सामन्यातही भारतीय संघ बंगळुरू येथील सामन्याप्रमाणे अडचणीत सापडला आहे. स्टार फलंदाज विराट-रोहित सपशेल अपयशी ठरले आहेत. टीम साऊदीने रोहितचा (०), तर मिचेल सँटनरने विराटचा (१) त्रिफळा उडवला, ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

पुण्यात खेळल्या जात असलेल्या दुसर्‍या कसोटीच्या दिवशी भारतीय संघाला सकाळच्या सत्रात शुबमन-विराट बाद झाल्या दोन मोठे धक्के बसले. विशेष म्हणजे भारताचा स्टार खेळाडू विराटलीला सँटनरने फुलटॉस बॉलवर क्लीन बोल्ड करत तंबूचा रस्ता दाखवला. विराट कोहली अशा प्रकारे बाद होण्याची ही पहिलीच वेळ आहे, त्याला नऊ चेंडूत फक्त एकच धाव करता आली.

## आयपीएल लिलावात सुंदरला विकत घेऊ शकते 'सीएसके'



**चेन्नई : वृत्तसंस्था**

वॉशिंग्टन सुंदरने तीन वर्षांनंतर भारतीय कसोटी संघात पुनरागमन करताना पुण्यात न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या डावात सात विकेट्स घेतल्या होत्या. त्याचवेळी आता आयपीएल २०२५ मेगा लिलावात वॉशिंग्टन सुंदरवर पैशांचा पाऊस पडू शकतो. आयपीएलच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघांपैकी एक असलेला चेन्नई सुपर किंग्स वॉशिंग्टन सुंदरवर पैशांचा वर्षाव करू शकतो, असे मानले जात आहे.

चेन्नई सुपर किंग्ज ऐतिहासिकदृष्ट्या फिरकी गोलंदाजांवर अधिक अवलंबून आहे. वॉशिंग्टन सुंदर सीएसकेचा भाग असेल तर त्यांच्या फिरकी गोलंदाजीला बळ मिळेल. विशेषत: सुंदरचा अलीकडचा फॉर्म उत्कृष्ट राहिला आहे. पुण्यात न्यूझीलंडविरुद्ध सात विकेट्स घेतल्यानंतर सुंदरला लिलावात मोठी किंमत मिळू शकते. चेपॉकच्या संथ आणि फिरकी अनुकूल विकेटवर सुंदर हा विरोधी फलंदाजांसाठी घातक गोलंदाज ठरू शकतो. गोलंदाजीशिवाय हा खेळाडू फलंदाजीतही योगदान देऊ शकतो. सीएसकेला सुंदरच्या क्षमतेचा फायदा होईल.

## क्रिकेट ऑस्ट्रेलियाने हटवली वॉर्नरवरील आजीवन कर्णधारपदाची बंदी



**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाचा माजी दिग्गज फलंदाज डेव्हिड वॉर्नरसाठी खूप आनंदाची बातमी आहे. या ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूवर असलेली २०१८पासूनची कर्णधारपदाची बंदी उठवण्यात आलीय. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने वॉर्नरवर कर्णधारपदाची आजीवन बंदी घातली होती, जी आता सहा वर्षांनंतर उठवली आहे.

डेव्हिड वॉर्नरवरील आजीवन कर्णधारपदाची बंदी उठल्याने तो आता बिग बॅश लीगमध्ये सिडनी थंडर्सचा कर्णधार होण्यासाठी पात्र झाला आहे. अनुभवी सलामीवीराने या महिन्याच्या सुरुवातीला तीन सदस्यांच्या स्वतंत्र पॅनेलसमोर आपली बाजू मांडली होती. वॉर्नरने त्याच्यावरील बंदी तत्काळ उठवण्याचे सर्व निकष पूर्ण केले असल्याचे या पॅनलला आढळले.

वॉर्नरच्या या प्रकरणाची चौकशी करणार्‍या पॅनेलच्या वतीने असे सांगण्यात आले की, त्याची उत्तरे सकारात्मक होती तसेच त्याच्या बोलण्यात पश्चाताप दिसला. त्यानंतर पॅनेलने एकमताने निर्णय घेतला की, तो भविष्यात कर्णधार बनवू शकतो. ही जबाबदारी तो प्रामाणिकपणे पार पाडेल.

### काय होते प्रकरण?

२०१८मध्ये ऑस्ट्रेलियाचा संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौर्‍यावर गेला होता. जिथे ऑस्ट्रेलियन खेळाडू कॅमेरून बॅनक्रॉफ्टने केपटाऊन कसोटी सामन्यादरम्यान बॉल टॅम्परिंग केले होते. नंतर ही योजना उपकर्णधार डेव्हिड वॉर्नरने बनवल्याचे उघड झाले. अशा परिस्थितीत क्रिकेट ऑस्ट्रेलियाने वॉर्नरवर दोन वर्षांची बंदी घातली आणि त्याच्यावर आजीवन कर्णधारपदाचीही बंदी घातली होती.

**कामासाठी मुलगा पाहिजे**

**अनुभव** :- MS-CIT, Tally कमीत कमी १ वर्षे अनुभव

**पत्ता** :- श्री.गणेश टेड्रर्स गाळा नं ४७-५० मार्केट यार्ड पनवेल

**मो.नं** :- ८६८९८९३७१५ 
९०२९३३९९९९

Salary: 15000 ते 18000

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com